मंगळवार, ९ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक




● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 9 APRIL 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-224 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05



## इंडिया आघाडीने देशाला नेहमीच अस्थिर ठेवले : पंतप्रधान नरेंद्र मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशात एका बाजूला भाजपाप्रणित एनडीएचे सरकार आहे, ज्यांना केवळ देशासाठी कठोर आणि भक्कम निर्णय घ्यायचे आहेत. दुसऱ्या बाजूला काँग्रेस आणि इंडिया आघाडी आहे, ज्यांचा एकच मंत्र आहे, जिथे सत्ता मिळेल तिथली मलाई खाऊन टाकणे इंडिया आघाडीने देशाला नेहमीच अस्थिर ठेवले आहे. एक स्थिर सरकार का आणि किती गरजेचे असते ते या महाराष्ट्राशिवाय दुसऱ्या कोणाला कळणार? इंडी आघाडीचे केंद्रात सरकार होते तोवर महाराष्ट्राची उपेक्षा होत राहिली. इंडिया आघाडी कट रचून, जनादेश बाजूला ठेवून सत्तेत आली तेव्हा स्वतःचा विकास हाच त्यांचा मंत्र होता, असा हल्लाबोल इंडिया आघाडीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. भाजपाचे चंद्रपूर लोकसभेचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी मोदींनी चंद्रपुरात प्रचारसभा घेतली. या सभेत त्यांनी काँग्रेससह शिवसेनेच्या ठाकरे गटावर सडकून टीका केली. मोदी म्हणाले, चंद्रपुरात उन्हाचा पारा वाढतो आहे, तसंच राजकीय वातावरणही तापू लागले आहे. परंतु, तुमचा (नागरिक) जोश, उत्साह अजिबात कमी झालेला नाही. या वेळी चंद्रपूरने ठरवले आहे 'फिर एक बार ४०० पार' याच चंद्रपूरने राम मंदिराच्या निर्मितीसाठी आणि संसदेच्या नवीन इमारतीसाठी लाकडे पाठवली आहेत, हे आम्ही विसरलो नाही. मराठीत एक म्हण आहे, कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले तरी ते कडूच राहतं. तुम्ही त्याला काहीही करा त्याचा कडवटपणा जाणार नाही. ही म्हण काँग्रेसला तंतोतंत लागू होते. कारण काँग्रेसवाले कधीच सुधारणार नाहीत. ते कधीच बदलणार नाहीत. त्यांनी आतापर्यंत जी कूकर्मं केली आहेत त्यामुळे त्यांनी देशातला जनाधार गमावला आहे. त्यामुळे काँग्रेसने आता फोडा आणि राज्य करा हे धोरण अवलंबलं आहे. तुम्ही त्यांचा निवडणुकीचा जाहीरनामा पाहा, त्यात मुस्लीम लीगची भाषा दिसतेय. ते तुम्हाला मान्य आहे का? देश हे सगळं स्वीकारेल का? असा सवालही त्यांनी केला.

## 'देशाचे संविधान आणि नकाशा पूर्णपणे बदलेल'

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे पती परकला प्रभाकर यांनी मोठे विधान केले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने विजय मिळविला तर देशात पुन्हा निवडणुका होणार नाहीत, असा दावा परकला प्रभाकर यांनी केला आहे. परकला प्रभाकर यांचा एक व्हिडिओ काँग्रेसने अधिकृत एक्स (ट्विटर) अकाउंटवरुन शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये एका यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत बोलताना परकला प्रभाकर यांनी हा दावा केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले तर पुढे काय होईल? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर परकला प्रभाकर म्हणाले, जर असे झाले तर पुन्हा निवडणुकीची अपेक्षा तुम्ही करु नका. आता २०२४ ची निवडणूक होत आहे. यामध्ये जर हे सरकार पुन्हा आले तर यानंतर पुन्हा निवडणुका होणार नाहीत. तुमच्याकडे असलेले देशाचे संविधान आणि नकाशा पूर्णपणे बदलेल. तुम्हाला ते ओळखताही येणार नाही. आता जे तुम्ही काही ऐकता एखाद्याला पाकिस्तानला पाठवा, त्याला तिकडे पाठवा. पण यानंतर अशा पद्धतीचे तुम्हाला लाल किल्ल्यावरून ऐकायला मिळेल. आता जे मणिपूरमध्ये होत आहे. उद्या ते आपल्या परिसरातही होऊ शकते, असे ते म्हणाले. या विधानामुळे राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चेला उधाण आले असून विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला आहे.

















विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

शेगाव नगरी म्हणजे श्री गजानन महाराजांच्या भक्तांची पंढरी. श्री गजानन महाराजांचे लाखो भक्त महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही आहेत. श्री संत दासगणू महाराज लिखित श्री गजानन विजय हा ग्रंथ म्हणजे भाविकांची भगवद्गीता . या ग्रंथाची दररोज पारायणे करणारे लाखो भक्त आहेत. दरवर्षी पंढरपूर प्रमाणेच शेगावची वारी करणारेही हजारो भाविक आहेत. शेगावीचा राणा श्री गजानन महाराज या वारकरी भक्तांचा विठ्ठल.शेगावी जायचे आणि या विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवायचे,तृप्त व्हायचे आणि समाधानाने परत फिरायचे हा भोळ्या भाविकांचा नित्यक्रम. आणि श्रद्धा तसे फळ.तुमची महारांवरील श्रद्धा दृढ असेल तर तुम्हाला त्यांची दिव्य प्रचीती,अनुभव आल्यावाचून राहणार नाही. श्री महाराजांसारखे संत पुरुष देहात असताना जेवढे कार्य करतात तेवढेच किंवा त्यापेक्षाही जास्त ते देहातीत झाल्या नंतरही करतात. त्याची प्रचीती आजही भक्तांना येते. जशी प्रचीती श्री गजानन महराजांच्या भक्तांना येते तशीच प्रचीती अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, शिर्डीचे श्री साईबाबा, ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज आदींच्या भक्तांना येते. हे सर्व संत देहाने आज आपल्यात नाहीत. पण त्यांनी केलेले कार्य आणि त्यांनी दिलेली भक्तीची प्रेरणा आजही लाखो भक्तांना जीवनात मार्गदर्शन करीत आहे.

या सर्व संतांची चरित्रे वाचली तर त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक चमत्कार केल्याचे दिसते. हे चमत्कार त्यांनी आपला मोठेपणा दाखवण्यासाठी केलेले नसून अज्ञानी जीवाना मार्ग दाखवण्यासाठी, त्यांच्या कल्याणासाठी ते त्यांना करावे लागले आहेत. श्री गजानन महाराजांनी केलेले चमत्कार तर आपली उक्ती आणि कृती यात एकवाक्यता असावी हे दाखवून देण्यासाठी त्यांनी केले. उदा.त्यांच्या चरित्रातील सुरुवातीला ते उष्ट्या पत्रावळीवरील अन्नाची शिते वेचून खातात. हा प्रसंग सांगतो की अन्न हे परब्रह्म आहे ते वाया घालवू नये.हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. एकदा ते कृष्णाजीच्या मळ्यात राहत असताना आलेल्या गोसाव्यानी नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैंन दहति पावकः या श्लोकावर प्रवचन द्यायला सुरुवात केली.आत्म्याचे निर्गुण निराकारीत्व सांगण्यास सुरुवात केली.पण त्यांच्याजवळ अनुभव नव्हता,त्यामुळे लोकांना तो शब्दच्छल वाटला. सर्व जण महाराजांजवळ जाऊन बसले. भास्कर पाटील महाराजांना चिलीम भरून देऊ लागला तेव्हा ठिणगी उडून पलंग पेटला.पण महाराज जागेवरून हलले नाहीत.त्यांनी गोसाव्याच्या महाराजांना बोलावून घेतले आणि जळत्या पलंगावर बसायला सांगितले.अग्नी आत्म्याला जाळू शकत नाही हे प्रत्यक्ष अनुभवाने दाखवा असे सांगितले.






## आनंदी पहाट

## अंतर्मनातील अकारण विचारांना थोपवून ठेवावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत एकूण सत्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन, ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि अपयश आपल्या वाट्याला येतं. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं.




आधुनिक केसरी

## अंतःचक्षु पाहु | रूप तुझे ||


निषीदिनी आम्हा | एकचि हा ध्यास ||
लाभावा निवास | तुझे पायी ||१||
क्षणोक्षणी घेऊ | नाम विठ्ठलाचे ||
वेड किर्तनाचे | लागो मना ||२||
सत्कर्माची जाण | आमुचे वैभव ||
विकार सदैव | जळो देवा ||३||
नको आम्हा काही | मान धन देऊ ||
दास तुझे होऊ | जन्मोजन्मी ||४||
ब्रह्मरस सेवु | ब्रह्मानंदी राहु ||
अंतःचक्षु पाहु | रूप तुझे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



पुष्प ३५वे

**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## राम :नैतिकतेचा सबळ विश्वास


प्रभु श्रीरामाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे नैतिकतेचा सबळ विश्वास होय. जे जे उन्मत्त, अराजक, अतिरेकी, आसुरी आहे, त्याचा पराभव, विनाश करण्याचे सामर्थ्य म्हणजे श्रीरामाची शक्ती होय. अध्यात्म मनाला उंची देणारे, मनाला सकारात्मक ऊर्जा पुरवणारे, मनाला विशालता देणारे, आत्म विश्वासाने समृद्ध करणारे, विवेक जागता ठेवणारे, विलक्षण शक्ती-स्त्रोत आहे. त्यात व्यक्ती, समाज दोन्हींचा उत्कृष्ट सहसंबंध जोपासला आहे. विश्वकल्याण व विश्व बंधुत्वासाठी चिंतनमग्न असणार्या त्यागी ऋषीं-मुनींच्या परिपक्व, ब्रह्मांडदर्शी दृष्टीतून भारतीय अध्यात्म साकारले आहे. ते जगता यावे, दैनंदिन आयुष्याशी एकरूप व्हावे म्हणून लोकमनाला भावतील, बांधतील अशा कथा नायकांची महाकाव्यात्मक निर्मिती ऋषींनी व ऋषीतुल्य प्रतिभांनी केली आहे. “कूजन्तं रामरामेति, मधुरं मधुराक्षरम्। आरुहय कविता शाखां वंदे वाल्मीकि कोकिलं।” अशी वंदना बुध कौशिक ऋषींनी रामरक्षेत श्री वाल्मीकिंना केली आहे. श्रीराम योगाचे दिव्य फळ आहे. श्रीराम मुक्तीचे उपास्य आहे. श्रीराम समाज व व्यक्ती मनाची श्रेष्ठता आहे. श्रीराम मनःशांती व विजयदाता ईश्वर आहे. श्रीराम सज्जनांचे रक्षक व दुर्जनांचे विनाशक आहेत. श्रीराम शैव + वैष्णव एकतेचे दैवत आहेत. श्रीराम मनाचा गोंधळ, द्वंद्व निवारक आहेत. श्रीराम रामराज्याचे संस्थापक आहेत. समानता, न्याय, बंधुत्व, स्वातंत्र्य, भौतिक व आध्यात्मिक सुखे, संघर्ष रहितता, मानवता, कर्मनिष्ठा, सद्गुणांचा विजय, मनाची विशालता या सर्वांचे उत्कृष्ट व्यवहार-स्वरूप म्हणजे रामराज्य, तेथे निर्भयता, निर्मळता, पवित्रता सतत नांदते असे ‘रामराज्य’ ही प्रत्येक युगाची आकांक्षा आहे. त्यासाठी ‘रामत्वाचा’ संस्कार बाणवणे, हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

महकारण तुरिया रहे, केवल तुरियातीत ।
हँस देह में आप्त है, अनुभव शब्द प्रतीत
।।४५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/४५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तुरिया अवस्थेत महाकारण, तुरियातीत अवस्थेत कैवल्य देह आणि आप्त अवस्थेत हंस देहाची प्राप्ती होते. शब्द परम प्रकाशाची आप्त अवस्था आहे. हंस देह हा आत्म्याच्या शुद्ध चेतन अवस्थेचा देह आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## सगुणभक्ति

आधुनिक केसरी



सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ‘ मला सोने भेटवा ’ असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी ‘कुणाचा’ आहे हे जर जाणले तर मी ‘ कोण ’ हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ‘ मी ’, त्याला पाहायला जंगलात जायला नको. ‘ माझेपण ’ सोडावे म्हणजे ‘ मी ’ चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास. सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ‘ सहजसमाधी ’ असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ‘ राम सर्व करतो ’ आणि ‘ राम माझा दाता आहे ’ ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच. नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सर्व संकल्प मारून टाकतो। आशेचा हात धरून कल्पना माणसाला द्रुष्यामध्ये गुंतवते. म्हणून साधक कल्पना करणेच बंद करतो. आता आपले कसे होईल? हे भय नाहींसे करतो. तो आपल्या सूक्ष्म देहाला जिंकतो. आपल्या वासना सुक्ष्म देहात रहातात. साधक या वासनानां पराभूत करतो. त्यांना जगणे अशक्य करतो. विवेकाच्या सामर्थाने साधक पाखंडाला त्रस्त करतो। पाखंडी मतांचा तेजोभंग करतो.
श्रीराम जय राम जय जय राम

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ९ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# वैजापुरात लाल चिखल



अचानक टोमॅटोचे दर घसरल्याने छत्रपती संभाजीनगर - नाशिक महामार्गावर रोटेगाव पुलाजवळील आंबेवाडी फाटा येथे शेतकऱ्यांनी सुमारे दोन ट्रॉली टोमॅटो उभरून देत संताप व्यक्त केला. हे विदारक दृश्य पाहून अभ्यासक्रमातील 'लाल चिखल' या पाठाच्या आठवणी जाग्या झाल्या. छायाचित्र : राहुल त्रिभुवन

!! श्रीचक्रधर स्वामी प्रसन्न!!
प्रथम वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा बाळा
तुझ्या इच्छा तुझ्या आकांक्षा उंच उंच भरारी घेऊ दे मनात
आमच्या एकच इच्छा तुला उदंड आयुष्य लाभु दे..

आमचा सर्वांचा लाडका
चि.निर्वेद

दि.९ एप्रिल २०२४ मंगळवार
चि.निर्वेद निलेश चव्हाण पहिल्या वाढदिवश
बाळा तुला जन्मदिनाच्या खूप खूप शुभेच्छा...!
-: शुभेईच्छुक :-
निलेश चव्हाण (पप्पा), सौ.शुभांगी निलेश चव्हाण (आई), गोकुळसिंग चव्हाण (बाबा), सौ.अलकाबाई चव्हाण (आजी), उमेश चव्हाण (काका), दिपक चव्हाण (काका), सर्वज्ञ चव्हाण (काका), सौ.योगिता पाटील (आत्या), सौ.मनिषा पाटील (आत्या),पुनम चव्हाण (आत्या), भागवत पाटील (बाबा), सौ. लताबाई पाटील (आजी), गौरव भागवत पाटील (मामा) व समस्त चव्हाण परिवार
सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे सायंकाळी संपन्न ७:३० वाजता संपन्न होत आहे.
संपर्क:-८८८८०२३६८६,९६७३८२१८३६

# बीडच्या राजकारणात वजाबाकीचीही बेरीज होते

## ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांची लोकसभा निवडणुकीवर परखड मुलाखत


आधुनिक केसरी

***बीड : द पॉलिटिक्स या टी. व्ही. चॅनलने राजकीय अभ्यासक आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची प्रदीर्घ मुलाखत घेवून बीड लोकसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थिती उलगडली आहे. नुकतीच समाज माध्यमात सदरील मुलाखत प्रसारीत झाली असून ती मोठ्या प्रमाणात पाहिली जात आहे. निवडणुकी संदर्भात वसंत मुंडे यांच्या मते भाजपसाठी राष्ट्रवादी चार एक गट सोबतीला आल्याने निवडणूक एकतर्फी होईल, असे वाटत असले तरी वस्तुस्थिती तशी दिसत नाही. कारण स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब सुद्धा म्हणत असत की, संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण समजेल परंतु बीड जिल्ह्याचे राजकारण समजणे अवघड आहे. बीड जिल्हा ही राजकीय प्रयोगशाळा आहे. म्हणुन बीड जिल्ह्यातील कधी काय होईल हे कोणीही सांगू शकत नाही. जिल्ह्यात जसं दिसतं तस होईल असे नाही, गणितात दोन अधिक दोन चार होतात पण राजकारण असे होईल, असे नाही. मराठा आरक्षणाचा मुद्दा हा खुप मोठ्या प्रमाणात चाललेला आहे. बीड जिल्हा त्याचे केंद्र आहे. कारण मनोज जरांगे पाटील हे मुळ बीडचे असल्याने मराठा आरक्षणाची तिव्रता अधिक आहे. भाजपने जरी उमेदवारी बदलून विद्यमान खासदार डॉक्टर प्रितम मुंडे यांच्या ऐवजी माजी मंत्री पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली असली आणि त्यांचा खूप गाजावाजा होत असला तरी पंकजाताईंना यावेळी बीडमधुन विजय मिळवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागणार आहे. मनोज जरांगे पाटलांचे मराठा आरक्षण आंदोलन गेम चेंजर ठरणार, असेही वसंत मुंडे यांचे भाकीत आहे.***




एका प्रश्नाच्या उत्तरात वसंत मुंडे म्हणतात की, भाजपने बीड लोकसभेसाठी पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे. आजच्या परिस्थितीत ही निवडणूक एकतर्फी वाटत असली तरी या मतदार संघात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा सामना सतत रंगत आला आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे आणि शरद पवार यांच्या भोवती या जिल्ह्याचे राजकारण फिरत आलेले आहे. परंतु आज पहिल्यांदाच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, अजित पवारांचा गट शरद पवार यांच्यापासून वेगळा झालेला आहे व जिल्हाचे पालकमंत्री धनंजय मुंडे या गटाचे नेतृत्व करतात. त्यांच्या सोबत जिल्ह्यातील तीन आमदार भाजप बरोबर आलेले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीची अर्धी शक्ती भाजप बरोबर आलेली आहे. धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हा जो राजकीय संघर्ष गेली दहा बारा वर्षे चालू होता तो संघर्ष आता थांबलेला आहे.

भाजप अंतर्गत नेतृत्व स्पर्धेतून पंकजा मुंडेंना लोकसभेची उमेदवार देण्यात आली आहे का? या प्रश्नावर बोलताना वसंत मुंडे म्हणाले, दोन वर्षांपूर्वीच पंकजा मुंडे यांना राष्ट्रीय सचिव आणि मध्यप्रदेशचे प्रभारी केले गेले तेव्हाच भविष्यात त्या लोकसभेच्या उमेदवार असू शकतात असा अंदाज आला होता. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे घडले. दिल्लीत त्यांना मोठी संधी मिळेल. स्व. गोपीनाथराव मुंडेसुद्धा २००९ मध्ये बीड लोकसभा लढवून दिल्लीत गेले होते व लोकसभेत पक्षाचे उपनेते झाले होते. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा लोकसंपर्क व त्यांना मिळणारे लोक समर्थन पाहता त्यांना दिल्लीत मोठा सन्मान आणि राज्यापेक्षाही चांगली संधी मिळेल, असे वाटते. पुढील प्रश्नाच्या उत्तरात वसंत मुंडे म्हणाले की, पंकजाताईंनी पत्रकार परिषदेतसुद्धा जाहिर केले की, प्रितमताईंना जास्त काळ विस्थापीत ठेवणार नाही. त्या दिल्लीत स्थिर होतील. तेव्हा प्रितमताईंचे राजकीय पुनवर्सन करणे त्यांना जास्त अवघड नाही म्हणून कालांतराने या दोन भगिणी भाजपमध्ये सक्रीय असतील यात वाद नाही. त्यांच्यासाठी ही नवीन संधी असून त्यांच्या नेतृत्वाचा हा विस्तार आहे. पुढील प्रश्नाच्या उत्तरात वसंत मुंडे म्हणाले की, धनंजय मुंडे आणि पंकजाताई मुंडे यांच्यात राजकीय वितुष्ट होतं. विधानसभेतही त्यांना धनंजय मुंडेंकडून पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु आताची परिस्थिती वेगळी आहे. धनंजय मुंडे अजित पवार गटात आहेत व अजित पवार गट भाजप महायुतीत आहे. हे मनोमिलन कार्यकर्ता लेवलवर झाले आहे? मुंडे साहेबांना मानणारा व त्यांच्यावर श्रद्धा असणारा खुप मोठा वर्ग आहे. मागच्या काळात मुंडे साहेब असतानाच काही अपरिहार्य कारणामुळे धनंजय मुंडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. त्या संघर्षातून धनंजय मुंडेंनी आपले नेतृत्व उभे केलेले आहे. त्यातून त्यांनी त्यांचे कतृत्व सिद्ध केलेले आहे. हे कोणालाही नाकारता येणार नाही आणि आता अशी परिस्थिती निर्माण झाली की, त्यांचाच पक्ष भारतीय जनता पक्षाबरोबर काम करीत आहे. त्यामुळे विधानसभेच्या वेळी हे सुत्र ठरलेलं असते की, ज्या पक्षाचा आमदार आहे त्यांना उमेदवारी दिली जाते. म्हणुन धनंजय मुंडेंना परळी मतदार संघातुन विद्यमान आमदार म्हणुन उमेदवारी मिळणार त्यामुळेच पंकजाताईंना लोकसभेची उमेदवारी मिळालेली आहे. पक्ष पातळीवर आघाडी होण्यापूर्वीच दोघांनीही कौटुंबीक पातळीवर संत भगवान बाबांच्या





नारळी सप्ताहाच्या मुहूर्तावर हा संघर्ष मिटविला होता. दोघांनीही एका व्यासपीठावर येवून आमच्यातील कलह आम्ही मिटलेला आहे, असे जाहीर केले होते. त्यामुळे कौटुंबीक पातळीवर त्याचं नातं आता एकदम व्यवस्थित आहे. म्हणुन कार्यकर्त्यातही आता कुठलाही संभ्रम नाही. कारण त्या कुटुंबाला मानणारा मोठा वर्ग आहे. ही भावना समाजाचीही होती. राजकारणामध्ये प्रत्येकजण संधी शोधत असतो, राजकीय क्षेत्रात टिकून रहायचं असतं, पुढं जायचं असतं, बजरंग सोनवणे हे महत्त्वकांक्षी राजकारणी आहेत. त्यांनी अतिशय रूट लेवलवरून, कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसतांना ते जिल्हा परिषदेत आले, जि.प. उपाध्यक्ष पदापर्यंत पोचले. मागच्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी पाच लाखांपेक्षा अधिक मते घेतली आहेत. त्यांच्याकडे दोन साखर कारखाने आहेत, अनेक संस्था आहेत आणि ते सतत कार्यशील असतात. लोकांमध्ये राहतात म्हणुन त्यांनी संधी मिळताच ते मैदानात उतरले आहेत. त्यामुळे बजरंग सोनवणे यांचीही चर्चा आहे. जिल्हाभर त्यांचा संपर्क आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष म्हणुन त्यांनी काम केले आहे. म्हणुन पक्षांतराचा खरा पॅटर्न हा बीड जिल्हा आहे. आता महाराष्ट्रात ज्या आघाडी वगैरे होतात या आघाड्यांची सुरूवात म्हणाल तर फार पूर्वीपासून बीड होते. खरा लोकशाहीवादी कोणता जिल्हा असेल तर तो बीड जिल्हा आहे. महाराष्ट्रात बीड जिल्ह्यासारखं राजकारण नाही. मागे शरद पवार साहेबांनीसुद्धा म्हटलेलं आहे. दिवसा आमच्या बरोबर असतात ते रात्री कोणाबरोबर असतात हे समजत नाही. मुंडे साहेबांनी सुद्धा अनेकदा जाहिरपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राचे राजकारण समजेल परंतु बीड जिल्ह्याचे राजकारण समजणार नाही. अनेक नेत्यांनी सुद्धा म्हटलेलं आहे की बीड जिल्हा ही राजकीय प्रयोगशाळा आहे. बीड जिल्ह्यात कधी काय होईल हे कोणीही सांगु शकत नाही. बीड जिल्ह्यातील प्रत्येक माणुस राजकीयदृष्ट्या जागरूक आहे. तो राजकीय परिपक्व आहे, ही या जिल्ह्याची खासीयत आहे. बीड जिल्ह्यात दोनच पक्ष नेहमी आमने-सामने असतात एक मुंडे साहेबांचा पक्ष भाजप आणि दुसरा शरद पवारांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस. आजच्या घडीला राष्ट्रवादीमध्ये दोन गट पडले असले तरी शरद पवार साहेबांना मानणारा मोठा वर्ग आहे. कारण चार साडेचार लाख मतं या मतदार संघात शरद पवारांच्या नावावर उमेदवाराला मिळतात. दुसरे म्हणजे आता सगळेच विरोधक एक झाल्यामुळे जे दुसऱ्या फळीतील गाव पातळीवरचे कार्यकर्ते आहेत ते अस्वस्थ असणे सहाजिक आहे. म्हणुन दुसरा पर्याय शोधत असतात. त्यामुळे बीड जिल्ह्यात हळूहळू चित्र स्पष्ट होणे सुरू होईल. कोण कोणाबरोबर जाणार हे स्पष्ट होईल.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराबाबत बोलताना वसंत मुंडे यांनी या प्रश्नाचे स्पष्टीकरण असे दिले की, अनेक जण इच्छुक होते. त्यात डॉक्टर नरेंद्र काळे, ईश्वर मुंडे पण आता बजरंग सोनवणे यांचे नाव पुढे आलेले आहे. लोकसभा आणि विधानसभा या दोन्हीचे समीकरण या बाबत विवेचन करताना वसंत मुंडे यांनी म्हटले की, राजकारणात इतिहासाची पुनरावृत्ती होते, असे माझे मत आहे. २०१९ ला जे झाले ते असे की, विधानसभेचे पाच आमदार, एक खासदार, पंकजाताई कॅबिनेट मंत्री असे काही असताना लोकसभेचा उमेदवार दीड लाखाने निवडुन आला. नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत चार मतदार संघात भाजपाचा पराभव झाला. फक्त दोनच मतदार संघात भाजप पक्षाचे उमेदवार निवडुन आले. म्हणजे जेंव्हा आपल्याला असे दिसते की, राजकारणामध्ये सगळं एका बाजुला आहे परंतु जस दिसतं तस कधीच होत नाही. म्हणुन आज लोकसभेला जे काही होणार आहे तसेच विधानसभेला होईल याची खात्री नाही. कारण विधानसभेला अनेक लोक इच्छुक असतात. लोकसभेला इच्छुकांची संख्या कमी असते. एकाच पक्षात पाच-पाच, सहा-सहा लोक विधानसभा लढविण्यासाठी सक्षम असतात आणि ते सर्व इच्छुक असतात. म्हणुन लोकसभेला जे झालं ते विधानसभेला अजिबात होणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट मराठा आरक्षणाचा मुद्दा हा खुप तीव्र आहे आणि बीड जिल्हा हे त्याचे सेंटर आहे. कारण मनोज जरांगे पाटील हे मुळ बीडचे आहेत. त्यामुळे बीडमध्ये आरक्षणाची तिव्रता अधिक तीव्र आहे. त्याच्यामुळे त्यांचा लोकसभेच्याही निवडणुकीत इफेक्ट बऱ्यापैकी दिसणार आहे आणि विधानसभेच्या निवडणुकीतही मोठ्या प्रमाणावर दिसेल.

मराठा विरूद्ध ओबीसीच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी ते म्हणाले की, असे ध्रुवीकरण झालेलेच आहे यात नवीन काहीच नाही. मराठा विरूद्ध ओबीसी असं चित्र निर्माण झालेलं आहे. पूर्वी असं नव्हतं. कारण आम्ही पत्रकारितेत गेल्या पंचवीस वर्षापासून वेगवेगळी समीकरण पाहत आलो आहोत. परंतु अलीकडच्या काळामध्ये ही जातीय समीकरण अधिक तीव्र झालेली दिसून येत आहेत. महाराष्ट्रात अलीकडे अगदी गावपातळीपर्यंत ही समीकरण तीव्र झालेली आहेत. ही बाब एक नागरीक म्हणुन मनाला बोचणारी आहे न पटणारी आहे. तरीही जे झालंय ते स्विकारल्याशिवाय पर्याय नाही. याच्यामध्ये राज्यकर्त्यांनी मार्ग काढणे आवश्यक होतं परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही. तो मार्ग निघु शकला नाही. म्हणून अगदी गावपतळीवरसुद्धा ओबीसी विरूद्ध मराठा अशी चर्चा आहे. सार्वजनिक पातळीवर लोक मिळुन मिसळून राहतात. असे असले तरी निवडणुकीत त्याचे परिणाम दिसून येतील. त्यामुळे मतांचे ध्रुवीकरण झालेले आहे. त्याचा फायदा कोणाला होणार आहे? हे निवडणुकीनंतर दिसेलच.

# चंद्राबाबूंचे आश्वासन

आधुनिक केसरी

राज्यात सत्तेत आल्यास कमी किमतीत मद्यविक्री करण्याचे आश्वासन आंध्र प्रदेशातील तेलुगू देसम पक्षाने दिले आहे. या श्वासनाद्वारे आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनतेला आकर्षित करण्याचा प्रयत्न टीडीपीकडून करण्यात आला आहे. त्यांच्या या आश्वासनाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. आंध्रप्रदेशमध्ये लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक एकाच वेळी होणार आहे. तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख चंद्रबाबू नायडू हे कुप्पममधील लोकसभेचे उमेदवार आहेत. नुकताच कुप्पममध्ये त्यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्तेत आल्यास चांगल्या दर्जाचे मद्य कमी किमतीत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच यावेळी त्यांनी मद्यबंदीच्या आश्वासनावरून जगन मोहन रेड्डी यांनाही लक्ष्य केलं. राज्यातील मद्याच्या किंमती कमी व्हाव्यात, अशी जनतेची इच्छा आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात तेलुगू देसम पक्षाचे सरकार आल्यास आम्ही ४० दिवसांनंतर जनतेला उत्तम दर्जाचे मद्य कमी किंमतीत उपलब्ध करून देऊ. ही आमची जबाबदारी आहे, अशी प्रतिक्रिया चंद्रबाबू नायडू यांनी दिली. देशात सध्या सर्वच वस्तूंच्या किंमती प्रचंड वाढल्या आहेत. त्यात मद्याचे दरही वाढले आहेत. मी मद्याचे नाव काढताच काही लोक जल्लोष करत आहेत. याचा अर्थ मद्याचे दर कमी व्हावे, अशी या लोकांची इच्छा आहे, असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी मद्यबंदीच्या मुद्द्यावरून जगन मोहन रेड्डी यांनाही लक्ष्य केले. जगन मोहन रेड्डी यांनी २०१९ मध्ये मद्यबंदीचे आश्वासन दिले होते. मात्र, काही दिवसांत या आश्वासनावरून त्यांनी माघार घेतली. त्यांच्या सरकारने मद्याची किंमत ६० रुपयांवरून २०० रुपयांपर्यंत वाढवली. तसेच १०० रुपये स्वत:च्या खिशात घातले, अशी टीका त्यांनी यावेळी केली. २०२२-२३ या आर्थिक वर्षात आंध्र प्रदेशातील वायएसआर काँग्रेसच्या सरकारने मद्यविक्रीतून जवळपास २४ हजार कोटी रुपयांचा महसूल गोळा केला होता. महत्त्वाचे म्हणजे चंद्राबाबू नायडू यांनी काही दिवसांपूर्वीच वायएसआर काँग्रेसच्या सरकारने राज्यात निकृष्ट दर्जाचा मद्यपुरवठा केल्याचा आरोप केला होता. याशिवाय जनसेना पक्षाचे प्रमुख पवन कल्याण यांनीही सरकारकडून राज्यात निकृष्ट दर्जाचा मद्यपुरवठा होत असल्याचा आरोप केला होता. राज्यात निकृष्ट दर्जाचा दारुपुरवठा सुरू राहिल्यास, राज्यातील जनता मोठ्या प्रमाणात आजारी पडेल, असेही ते म्हणाले होते.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

# हिंदुत्वाचा वटवृक्ष : डॉ. हेडगेवार

आधुनिक केसरी

**डॉ. केशव बळीराम हेडगेवार या महामानवानी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वाटचाल शताब्दीच्या दिशेने चालू आहे. डॉक्टरांच्या जीवनकार्याचे मंत्र सामर्थ्य कशात असेल तर त्यांच्या हिंदुत्व विचारात आहे. हिंदुत्वाचे श्रेष्ठ जीवनमूल्य राष्ट्रजीवनात रूजविण्यासाठी त्यांनी मांडलेला सिद्धांत यशस्वी ठरला आणि तो गतिमान व परिवर्तनशीलही राहिला. महान पुरूषांची चरित्रे म्हणजे राष्ट्राचा अर्धा इतिहास असतात, या कार्लाईलच्या सत्याची प्रचिती डॉ. हेडगेवारांच्या चरित्र चिंतनातून प्रकट होते. १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नागपूर येथे मोहिते मळ्यात स्थापना करण्यात आली.**

हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे हा सिद्धांत घेऊन भारत हे हिंदू राष्ट्र आहे हे सत्य प्रस्थापित करण्यासाठी ज्या महामानवाने आपले आयुष्य खर्ची घातले आणि भारतमातेच्या चरणी समर्पित केले त्या महामानवाचे नाव आहे डॉ. केशव बळीराम हेडगेवार. ते खऱ्या अर्थाने वैद्यकीय डॉक्टर होते पण त्यापेक्षाही त्यांचे वर्णन काळाच्या पुढे असलेला समाजशास्त्रज्ञ असे करावे लागेल. कारण त्यांनी भारतीय समाजातील गुणदोषांचे, यशापयशाचे ऐतिहासिक समाजशास्त्रदृष्टीने आकलन करून भारतापुढील समस्यांवर यथार्थ उपाययोजनेचा मार्ग प्रस्थापित केला. विराट समाज पुरुषामध्ये निद्रिस्त झालेला पुरुषार्थ जागृत केला. दीनदलितांना सामाजिक न्याय, स्त्रिया व वंचितांना सन्मान, वनवासी, आदिवासी व अल्पसंख्यांकांना राष्ट्रजीवनाच्या मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मांडलेले प्रमेय प्रत्यक्षात साकारले आहे. सर्व प्रकारच्या दारिद्यामध्ये विचारांचे दारिद्य हे भयावह असते. ते दूर केल्याशिवासय राष्ट्रजीवन खडबडून जागे होत नाही. हा नवचैतन्याचा, परिवर्तनाचा मार्ग या समाजशास्त्रज्ञाने दाखविला. तेच आज नवहिंदुत्वाचे यशोगान ठरले आहे.

**बालपण आणि संस्कार यात्रा :** त्यांचा जन्म १ एप्रिल १८८९ रोजी निझामाबाद जिल्ह्यातील महाराष्ट्र-कर्नाटक व आंध्रप्रदेशच्या सीमेवरील कंदकुर्ती या खेड्यात तेलगू देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात झाला. शोषाद्री यांनी लिहिलेल्या चरित्रात असे म्हटले आहे की, कंदकुर्ती हे गाव राज्य पुनर्रचनेपूर्वी गोदावरीच्या काठी नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात समाविष्ट होते. आता ते निजामाबाद जिल्ह्यातील बासर या तालुक्यात समाविष्ट आहे. बासर येथील सरस्वतीचे मंदिर प्रसिद्ध आहे. आणि महर्षी व्यास यांनी दक्षिणेचा दौरा केला तेव्हा त्यांनी बासर येथील एका गुहेत तपश्चर्या केल्याचे सांगितले जाते. पुढे हेडगेवार कुटुंबीय कंदकुर्तीहून चरितार्थासाठी नागपुरास स्थलांतरील झाले. त्यांचे बालपण नागपूर येथे गेले. त्यांच्या वडिलांचे नाव बळीरामपंत आणि आईचे नाव रेवतीबाई असे होते. आई-वडिल दोघेही प्लेगच्या साथीमध्ये १९०२ साली स्वर्गवासी झाले. तेव्हा केशवाच्या जीवनावरील छत्र हरपले. परंतु त्यांच्या काकांनी व थोरल्या भावानी त्यांचा सांभाळ केला. त्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण दिले, सुसंस्कारित केले.नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला आणि प्राथमिक शिक्षणाला प्रारंभ केला. तत्कालिन ब्रिटीश वसाहतवादी शिक्षणाच्या प्रणालीमध्ये जणू काही गुलामगिरीचेच वातावरण होते. तेथील नियम अत्यंत जाचक असत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शाळेतून काढून टाकले जात असे. मातृभूमीच्या उत्कट प्रेमाने, ध्येयवादाने, विलक्षण स्वयंस्फूर्तीने केशवाने आपल्या शाळेत वंदे मातरम् हे गीत म्हटले. त्यावरून त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. परिणामी, त्यांनी संघर्षाचा मार्ग स्विकारला. पुढे यवतमाळच्या राष्ट्रीय विद्यालयात प्रवेश घेतला आणि त्यानंतर त्यांनी पुण्यामध्ये जाऊन हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. हा सारा त्यांचा बालपणीचा काळ मोठा संघर्षाचा होता. येथे जो संघर्षाला प्रारंभ झाला तो त्यांनी आयुष्यभर संघर्षाचा कालक्रम चालूच ठेवला. त्यांच्या कुटुंबाचा वारसा कंदकुर्ती येथील अध्यात्मिक परंपरेत जाणवतो. कश्यप गोत्रातील हे कुटुंब शाप्त शाखेचे होते आणि त्यांची परंपरा ऋग्वेदातील



अश्वलायन सूत्राशी संबंधित होती. प्रामुख्याने वेद शिकणे आणि शिकविणे, वेदविद्या प्रसारित करणे हा त्यांचा एकमेव पारंपरिक व्यवसाय होता. म्हणजे वेदविद्येची संपन्न परंपरा असलेल्या कश्यप ऋषींच्या शाखेतील डॉ. हेडगेवार यांनी नवा वेद लिहिला आणि समाज परिवर्तनाला नवी दिशा दिली ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ते पौरोहित्य करणारे ब्राह्मण कुटुंब होते. पण केशवाने लहानपणीच या प्रकारच्या कार्यास नकार दिला व परंपरेविरुद्ध बंड केले आणि आपल्याला काही वेगळे राष्ट्रजीवनाचे कार्य करावयाचे आहे ते त्यांनी मनोमन ठरविले आणि त्यांचा संकल्प त्यांनी सिद्धीस नेला आणि उभे आयुष्य त्यांनी राष्ट्रचरणी समर्पित केले. राष्ट्रीय सेवक संघ शताब्दी वर्षात पदार्पण करत असताना या निमित्ताने डॉ. हेडगेवार यांच्या जीवनाचे स्मरण करणे उचित ठरेल. डॉ. हेडगेवारांच्या जीवनावर समर्थ रामदासांच्या दासबोधाचा आणि संत तुकारामांच्या गाथेचा प्रभाव होता. या दोहोंच्या क्रांतीकारक विचारांचे दर्शन त्यांनी त्यांच्या संत साहित्यातून अनुसरले होते. अनेकवेळा मराठी संतांच्या विचारांचे दाखले ते देत असत. त्यांनी समर्थ रामदासांच्या दासबोधाची अनेकवेळा पारायणे केली होती. संत तुकारामांची गाथाही त्यांना मुखोद्‌गत होती. समर्थ रामदासांचा महाराष्ट्र धर्म त्यांनी अनुसरला व त्याचे रुपांतर हिंदुत्वात केले. संत तुकारामांच्या सेवाकार्याचा विचार त्यांनी प्रत्यक्षात कृतीमध्ये आणला आणि लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या गीतारहस्याची अनेक पारायणे करून या विचाराला त्यांनी नवा अर्थ प्राप्त करून दिला हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. पुढे त्यांचा संपर्क काँग्रेसचे कार्यकर्ते बी.एम. मुंजे यांच्याशी आला. मुंजे हे जसे काँग्रेसचे कार्यकर्ते होते तसे ते हिंदू महासभेचेही अध्यक्ष होते. त्यावेळी दोन संघटनांचे सदस्य होता येत असे. तरुण केशव बळीराम हेडगेवारांना त्यांची चतुराई आणि हुशारी पाहून आश्रय देण्याचे मुंजे यांनी ठरविले आणि मुंजे यांनी त्यांच्यात एक विलक्षण ध्येयवाद जागृत केला.

**सखोल वैचारिक प्रभाव :** शालेय जीवनात शिकत असताना केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याचा विलक्षण प्रभाव होता. तसेच लो. बाळ गंगाधर टिळक यांनी लिहिलेल्या गीतारहस्याचीही त्यांनी अनेक पारायणे केली होती. टिळकांचे विचार म्हणजे क्रांतीकारकांना नवी दिशा देणारी एक जणू खाणच होती. डॉ. हेडगेवार यांचे क्रांतदर्शी जीवन मराठी मातीच्या मुशीतून घडले आहे. तसेच नागपूरच्या सार्वजनिक जीवनात काम करणारे बाळकृष्ण शिवराम मुंजे यांच्या ते सान्निध्यात आले. मुंजे हे राष्ट्रीय महासभेचे तसेच हिंदू महासभेचे कार्यकर्ते होते. पुढे हेडगेवारांची हुशारी व त्यांची तल्लख बुद्धिमत्ता पाहून त्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी कलकत्त्याला पाठविण्याचा निर्णय सुद्धा मुंजे यांनीच घेतला व त्यांना तशी प्रेरणाही दिली. माणसाच्या जीवनात प्रवेश करणाऱ्या एखाद्या व्यक्तीचा सूर्यबिंबासारखा पडणारा प्रभाव किती महत्त्वाचा असतो हे यावरून लक्षात येते. डॉ. हेडगेवार यांच्या चरित्राचे विचारमंथन केले असता काही विचारांचे मोती समोर येतात. डॉ. हेडगेवारांची वैचारिक जडणघडण कशी झाली, त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे फुलले, त्यांच्या विचारांना क्रांतीचे धुमारे कसे फुटले हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**वैद्यकीय शिक्षणाचा ज्ञानयज्ञ :** शालेय जीवनापासून ते वेगळ्या दिशेने विचार करत होते. कलकत्त्याला गेल्यानंतर त्यांनी क्रांतीकारक संघटनेमध्ये घोष यांच्या बरोबरीने काम केले. ज्या चक्रवर्ती कुटुंबासमवेत ते ४-५ वर्षे राहिले, ते चक्रवर्ती कुटुंबीय आजही संघाच्या सेवाकार्यात अग्रेसर आहे. कलकत्ता येथे वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेताना नित्य वाचन, मनन, चिंतन आणि समाजसेवेचा ध्यास घेऊन त्यांनी आपला संपर्क वाढविला. देशभरातून शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यासमवेत त्यांनी भारतीय समाज व संस्कृतीचे दर्शन घेतले. सबंध देशातून वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विविधतेचे स्वरूप लक्षात घेऊन त्यांना एकत्र गुंफण्यासाठी एखादी राष्ट्रीय संघटना असावी असे त्यांना वाटू लागले. वैद्यकीय शिक्षण घेत असताना भारतीय समाजाच्या अनारोग्याची कारणे रूढी, परंपरा आणि पोषण विचारात आहेत हे ओळखून त्यांनी सर्वांसाठी आरोग्य कसे प्रदान करता येईल याचेही चिंतन केले. गलितगात्र झालेल्या भारतीय समाजात नवविचारांची पेरणी करणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले व त्यातूनच राष्ट्रचैतन्याचा विचार पुढे आला आणि राष्ट्रजीवनात पुरुषार्थ जागृत करण्याची गरज त्यांनी ओळखली. राष्ट्राच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी संघटन कार्य फार महत्त्वाचे असते. एखादी संघटना जन्माला येते आणि ती देशाचे सबंध प्रारब्ध बदलून टाकते आणि त्या संघटनेची बीजे रोवण्यासाठी त्या संघटनेच्या संस्थापकाला मोठ्या दूरदृष्टीने काम करावे लागते आणि असेच दूरदृष्टीने काम डॉ. हेडगेवार यांनी बजावले असल्याचे दिसून येते. **क्रमशः**



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# नवे वर्ष नवी आव्हाने

आधुनिक केसरी

**नवे वर्ष नेहमीच काही तरी नवे घेऊन येते. हा निसर्ग नियम आहे. भविष्य हे वर्तमाना पेक्षा वेगळे असते. वर्तमानात आपण अनुभवीत असलेले बदल खरेच आश्चर्यकारक असेच आहेत. आपल्या देशापुरते बोलायचे झाल्यास सामाजिक, राजकीय वातावरण पार गढुळले आहे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे अधिक काळ लोटल्या नंतरही या स्वातंत्र्याची किंमत आपल्याला कळली नाही असे खेदाने म्हणावे लागते. उत्तम संविधान, सकस लोकशाही, सुदृढ न्राय व्यवस्था सारे काही उत्तम असूनही, आपण स्वतःला प्रगत म्हणवून घेत असलो तरी, देश आनंदी नाही. आनंदी देशाच्या क्रमवारीत आपण रसा तळाला आहोत! गरीब श्रीमंत ही दरी कमी होण्या ऐवजी वाढतेच आहे. बेरोजगारी प्रचंड प्रमाणात आहे. उत्तम शिक्षण व्यवस्था फक्त कागदावर..**

मुळात शिक्षणाचा दर्जा घसरतोच आहे. आपली तरुण पिढी देशा बाहेर जाऊन श्रीमंत होतात, नाव कमावतात हे खरे. पण त्या अल्प संख्येच्या तुलनेत मागे इथेच राहिलेल्या तरुण पिढीचे काय? किती जण शाळेच्या पुढे उच्च शिक्षण घेतात? किती देशाच्या प्रगतीला हातभार लावणारे सक्रिय, सृजनात्मक योगदान देतात? हे भरीव योगदान कुठेच लक्षणीय स्वरूपात डोळ्यात भरत नाही. उलट रस्स्पावर निरर्थक मोर्चात निरुद्देशिय गर्दीत हीच पिढी लाखोत दिसते! हातात दर्जेदार पदवी घेऊन मिरवणारे फार कमी. पण हातात कोणाचा तरी झेंडा, गळ्यात कुठल्या तरी पक्षाचे उपरणे घालून निरुद्देश फिरणारे मात्र जास्सु, अशी दारुण अवस्था आहे समाजाची. हाताला काम असते, माणसे आपापल्या कार्यात गुंतली असती, व्यस्त असती तर हे चित्र दिसले नसते. हे निष्क्रिय चित्र बदलणे आपल्यापुढे फार मोठे आव्हान आहे. गढूळलेल्या राजकारणा बद्दल, धर्म जातीत दुभंगलेल्या समाजा बद्दल काय बोलायचे? जी नेते मंडळी हा गोंधळ घालताहेत त्यांना आपणच निवडून दिले आहे. सरकार बदलणे जनते च्या हातात आहे असे आपण म्हणतो खरे, पण ते कागदा वरचे प्रमेय आहे! कारण आपण त्याच त्या प्रकारच्या, जातीच्या माणसांना पुन्हा पुन्हा निवडून देतो हे कटू सत्य आहे! फार कमी विचारी, हुशार, प्रामाणिक, सतच्छिल माणसे आपण सत्तेत बघतो. हे चित्र आपण इच्छा असूनही बदलू शकत नाही ही खरी शोकांतिका आहे. उत्तम दर्जेदार नैतिक शिक्षण, उत्तम हेल्थ केअर, शुद्ध पाणी, शुध्द वातावरण, राहायला प्रत्येकाला घर.. या मूलभूत गरजा आहेत कुठल्याही समाजाच्या. पण दिल्ली सारख्या राजधानीच्या शहरातच मोकळा श्वास घेऊ शकत नाहीत लोक! मुंबई पुणे सारख्या शहरात फक्त दोन महिने पुरेल एवढेच पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.. अनेक शाळेत शिक्षक नाहीत. विद्यापीठातील, उच्च शिक्षण संस्थांतील हजारो पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत ! अनेक गावात नावालाच दवाखाना आहे. तज्ञ डॉक्टर नाहीत. इमर्जन्सी केसेस हाताळणारी व्यवस्थाच नाही. आधुनिक तंत्रज्ञान खेडे गावातील शेतात पोहोचलेले नाही. प्रत्येकाच्या हातात महागडे मोबाईल मात्र आहेत. पण त्याने शेती होत नाही. असाध्य रोग बरे होत नाहीत. शुद्ध पाणी, हवा मिळत नाही.. तंत्रज्ञानाने आपल्याला सुखी आनंदी केले नाही.. आळशी मात्र केले! आपल्याला तंत्रज्ञान कसे, कशासाठी, किती वापरायचे हेच कळले नाही.. ती समज प्रत्येकात येणे हे खरे आपल्या पुढील आव्हान आहे. आपल्यात धमक आहे, प्रतिभा, ऊर्जा देखील आहे. पण जाण नाही, इच्छा शक्ती नाही. आळस आता रक्तात इतका मुरला आहे की सगळे फुकटात हवे. सगळ्या सवलती हव्यात. कष्ट न करता श्रीमंत व्हायचे आहे प्रत्येकाला. हे लोकशाही चालविणाऱ्या राजकारणी पुढाऱ्यांना पक्के कळले आहे. दर पाच वर्षांनी ही मंडळी त्यांच्या तालावर आपल्याला नाचवतात. गारुड्या समोरील बंदरा सारखे बहुसंख्य लोक नाचतात त्यांच्या पुढे. या नाचण्या साठी आश्वासने मिळतात. गाजरं मिळतात. आपण सारे तेव्हढ्या पुरते ख षःआपली सारखी फसवणूक होतेय हेही आपल्याला कळत नाही. खरे तर कळते पण वळत नाही! हे नाटकाचे नेपथ्य बदलणे आपल या पुढील फार मोठे आव्हान आहे. आपल्याला आपण सोडून बाकी सारे बदलावेत म्हणजे परिस्थिती बदलेल असे वाटते. पण प्रत्येकाने हाच विचार केला तर काहीच बदलणार नाही. **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गावशिवाराची प्रसन्न भावव्याकूळ कविता : फुटवे


आधुनिक केसरी

***आयुष्यगाथा चिंब भिजू दे कवितेच्या बनी***
***बुडून तरू दे तूच नाथा, माझी इंद्रायणी ॥***

हे कवितेचं मनभरलं कोरीव लेणं. कुठेही दुःखढगांचा लवलेश नाही. सारं कसं नितळ झ-यासारखं खळाळून मुक्त व्यक्त होत राहणं. आपलीच वळणवाट घेत ही कविता मोहरली बहरली. लदबदून आली पानोपानी. सवसांजेला शब्दसुरांचा गंधार आळवीत आली. जसे आरस्पानी रंगबावरी मुक्त मोरणीवानी..

***"मावळतीचे उधळून रंग***
***जूनी चाहुल नवा तरंग***
***चंद्र खुणवी पुन्हा***
***उन्हा रे, येशील का तू पुन्हा"***

ग्रामीण स्त्री जीवनातील भावतरंग शब्दांच्या नजाकतीत मन ओले चिंब करतात. श्रावणाची लडिवाळ ओढ. मनाचा नाचरा मोर मनमुक्त मोरणी होऊन चिंब पावसानं झिंबाड थुईथुई थेंब नाचत ये रे घना..अशी ओलीचिंब सय या कवितेची आहे. महाराष्ट्रातील भावकवयित्री म्हणून नावलौकिक झालेल्या डॉ. संजीवनीताई तडेगावकर यांचा 'फुटवे' या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती रानगंधाची भावव्याकुळ गोकुळ कविता आहे. लोकलयीचा अनुबंध असलेली भावकविता रानमातीचा भुईगंध घेऊन येते. शब्दफुले एखाद्या वेलीवर लदबदून यावी आणि फुलांची गुंफण व्हावी इतकी तरल भावगर्भ आशयसंपन्न रचना 'फुटवे' या कवितेची आहे. शब्दलयीचं नांदणं, एक निर्लेप नितळ गोंदण ही कविता देते. झाडाखोडाच्या लयदार अंगावर चमकदार पानाचे फुटवे उगावेत असे निस्सीम काव्यभक्तीचे हे एक गोजिरवाणे रूप. जणू अंतःकरणी प्रचंड नितळ झरा लागावा इतकी लाघवी ही कविता. नाद हा एक सृजनशील आत्मानुबंधाची भेट आहे. म्हणून ही कविता एक सावळी बाधा होऊन विवेकी शब्दलयीने पंख फडफडून येते. हा काव्यसृजनाचा अंतर्नाद आहे. हे फुटवे रानभुईचे झाडांच्या पान सखीचे. ही हिरवीगार शिरशिरीची बाधा. तर सावळ्या कृष्णाच्या लगीरबाधेची ही निस्सीम भक्ती आहे. हा नितळ शीतळ दवांचा पावा. फुटव्यांचा वेल्हाळ मेवा. हे काव्यभक्तीचे गीत होऊन जेव्हा येते. जसे




***"जणू सावळ्या***
***हरीने पाव्यात गीत गावे,***
***वृंदावनी सुरांनी राधा बनून यावे"***

सवसांजेला ओढाळ ओढ लागावी तशी शब्दअंगार पेरत ही कविता मनस्वी तुळशीवृंदावनाला निरंजनी ठेवते. शब्द रांगोळीत इतके रेखीव रंग पडावे इतकी लाघवी कविता आहे. रांगोळीत भरते रंग, ही रंग नभीची लाली. हळद माखल्या मेंदी रेखल्या ओल्या मनबंधाची एक अल्लड वेल्हाळ कविता.ओतीव व कातीव नक्षीकांत होत असताना या कवितेने ***"शब्दसुरांच्या मैफिलीत या कविता होऊन जाणे कुणासाठी हे रूतून बसले, गळयात माझ्या गाणे"*** एक सृष्टीचे सृजन मृदगंध जसा पुलकीत व्हावा तसा काव्यात्मा हा अतिशय लौकिकाचा आहे. उमाळा दाटून यावा आणि रडू फुटावे अलगद मनाच्या खोल तळाशी जावे. या ग्रामीण कवितेची एक ठळक ओळख म्हणून गीत ते भावव्याकुळ काव्यरचना. मुक्तछंदाची शब्द यमकांची लोकलय मनस्वी. भावसौंदर्य नखशिखांत. प्रतिमा, प्रतीके, उपमा, उपमेय, लय, नाद आशयघन असल्याने फुटवे एक उगवतीचे रंग आणि सवसांजेचे कोवळे तांबूस उन्हं होऊन ही कविता म्हणते. **"आता हुरहुर सांज दूर धुके दाटलेले माझ्या डोळ्यामध्ये सख्या तुझे रूप साठलेले".** ही कविता नुसतीच ओळीने कंठात ओतप्रोत भरून मनाची भल्लरी वल्लरी करीत मनाचे आभाळ रंग देते.

***"कवितेचे आभाळ भरून येते***
***मी त्याला ओटीओच्यात घेते"***

गावशिवाराच्या अखर, अंगणातली मायबोली इतक्या तरलतेने फुटवे ताटवे, शब्दकळेने बहरुन यावे इतके सजल रूप या कवितेला दिले आहे. 'सांजसयीला रूतला काटा'. "कुण्या देऊळ गाभारी, पान्हावते सांज बाई कृष्णनादात बुडाल्या, माझ्या गोकुळाच्या गाई" असे आशयसंपन्न गुलाबी गोंदणं लेऊन आलेली ही कविता. बाई कपाळभरून दिलंय अहेवाचं लेणं, पायी जोडव्याचं देणं. बाईपणाची प्रचंड खोल निर्लेप नितळ अभिव्यक्तीची सशक्त कविता. नभात चांदणे फुलवून यावे. तूच सखी अन् तूच कविता. आईच्या मांडीवर हळुवारं डोकं ठेवून अंगाई गात ही कविता सखी होऊन जाते. तर आपल्या सन्मित्र जोडीदाराशी एक उदात्त निखळ प्रेमाची अनुभूती व्यक्त करताना कवयित्री म्हणते...

"टेकताना तुझ्या दारी, ठेव खांद्यावरी हात आज गाऊ दे रे नाथा, भैरवीला राऊळात" ही सविनय भक्ती या कवितेने दिली आहे. काट्या कुपाट्याची, गावशिवाराची वळणवाट, काळ्याभुईचं हिरवं लेणं, वा-याची झुलती फांदी, नदी, पाणवठा, निसर्गाला कवेत घेत मनमुक्त लडिवाळ शब्दांची चांदणरात करीत रचना संपन्न करणे हे या कवितेचे विशेष आहे. जसे

***"बारमाही शिमग्याला,***
***रंग पिचका-या भरून देते***
***आणि रंगात भरून कविता येते"***

आयुष्यात कवयित्रीला अक्षरं मिळाली अन् कविता जगण्याला अर्थ आला. फुटक्या पाटीवर काढलेली ती अक्षरं आयुष्य इतकं वळणदार करतील याची यत्किंचितही कल्पना नव्हती. ही कविता इतकी प्रसन्न झाली आहे की, थोर कवी, समीक्षक प्रा. प्रसन्नकुमार पाटील यांचा चिंतनात्मक आशयसंपन्न दीर्घ लेख या संग्रहात मार्गदर्शक ठरतो. लोकलयीचा नाद या कवितेला आहे म्हणून डॉ. साहेब खंदारे यांची लोककथेचे काव्यमय धागे उलगडून दाखवणारी प्रस्तावना हेही या कवितेचे अमोघपण आहे. माहेरपणाची ओढ स्नेही ओलाव्यातून इतकी तरल व्यक्त होते.

***"पाणोठ्याशी पाझरते, बाई घागरीची जात***
***काल उंब-यात उभी, माहेराची ओवी गात"***

प्रतिमा प्रतीकांचा मोह नाही. सहज सुलभ अस्सल उत्कट काव्यानुभव हे या कवितेचे वैशिष्ट्य. रात दवात भिजते, पायवाट सोनपिवळी होते. घाट नभाचा हिरवा. उन्हातान्हाचा पाऊस, पाय चंदनी गोंदणी, रात्र दिव्याचा जीव जाळीत काळीज उसवते, रान सुगीच्या पंखाचे, उन्हाचा कुळवंश, कळीकाळाची तहान, कृष्णकांत त्या सावल्या, दुःखाचा मरणडोह, जीवाचा चेंडकुबा होऊन जीव फुलपाखरू पंख लावून, ऋतुची भयमुक्त गाणी आयुष्य ओटीतून सांडत राहते, गावशिवार माणसाचं गणगोत आणि रानगंधाचं भारलेपण निसर्गाशी असलेले भावबंध या कवितेचा आत्माविष्कार आहे. या कवितेचा संयत स्त्री विद्रोह जर पाहिला तर फरदाड फुटावे "माय सावित्रे, तुझं दूध पिऊन वाघीणी चवताळल्या आहेत" किंवा बंधमुक्त प्रवाहात दिशाहीन वाहण्यापेक्षा, बंदिस्त किनारा वाईट नाही" हा एक सशक्त सवाल काव्यवंशात दिसून येतो. हा वेगळा ठसा उमटत रहावा हीच सदिच्छा.

-डॉ. प्रभाकर शेळके

# विद्यार्थ्याला क्रूरपणे मारहाण शिक्षिकेवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**साक्री :** येथील गुरुवर्य गोळवलकर प्राथमिक विद्यामंदिर येथील नुकतीच एक निंदनीय घटना समोर आली आहे. इयत्ता ४ थी मधील रनविर प्रकाश थोरात या विद्यार्थ्याला भागाकार जमला नाही म्हणून निलाक्षी नांद्रे नामक शिक्षिकेने रनविर ह्या विध्यार्थ्याला काठीच्या साह्याने शरीरावर जखमा येईपर्यंत मारल्याची घटना घडली आहे.

याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, दि. ५ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजेच्या सुमारास रनविर प्रकाश थोरात यास त्याचे आजोबा हे शाळेतुन घरी घेऊन आले तेव्हा त्यांना कासारे येथे जायवयाचे असल्याने रनविर यास सांगीतले की, तु शाळेचा ड्रेस बदलवुन घे असे सांगीतले तेव्हा तो, त्याचा शाळेचा ड्रेस बदलवत असताना त्याच्या बहिणीला पाठीवर वळ दिसले तेव्हा तिने पालकांना त्याबाबत सांगीतले कि पालकांनी पीडित रणवीर ह्याला विचारले की, हे वळ कशाचे आहेत तेव्हा त्याने सांगीतले की, मला सकाळी ०९:०० वाजेचे सुमारास आमच्या शाळेतील मॅडम निलाक्षी नांद्रे यांनी मला भागाकार आला नाही यामुळे मला लाकडी गोल काठीने माझ्या पाठीवर मारहाण केली असे सांगीतल्याने पालकांनी रनविर यास दुपारी ०३:०० वाजेच्या सुमारास साक्री पोलीस स्टेशन येथे घेवुन आले. त्यांनतर रनविर यास उपचाराकामी मेमो दिल्याने रनविर याच्यावर उपचार करण्यासाठी रूग्णालयात घेऊन उपचार केल्यानंतर पोलीस स्टेशनला येऊन सदर झालेली घटना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.यावेळी गुरुवर्य गोळवलकर प्राथमिक विदया मंदीर टाटीया नगर साक्री येथील शिक्षीका निलाक्षी नांद्रे यांचे विरुद्ध कलम ३२४ व अल्पवयीन न्याय कायदा२०१५ नुसार कलम ७५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# ऐका मतदारांनो... या पोवाड्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती..

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यातील पुंगळा तांडा,केंद्रीय प्राथमिक उर्दू शाळा जिंतूरचा परिसर या भागामध्ये स्वीप पथकाद्वारे मतदार जनजागृती करण्यात आली. भारतीय निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हास्तरीय स्वीप नोडल अधिकारी गणेश शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती संगीता सानप, तहसीलदार जिंतूर तथा 95 जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरवदे, तहसीलदार सेलू तथा 95 जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दिनेश झांपले, नायब तहसीलदार निवडणूक सुग्रीव मुंडे यांच्या नियोजनानुसार मतदार जनजागृती कार्यक्रम सुरू आहे. लोकशाही बळकट आणि सक्षम करण्यासाठी निवडणुकीतील मतदान प्रक्रियेत मतदारांचा जागरूकतेने उत्स्फूर्त मोठ्या सहभागाला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक निवडणुकीत सर्व मतदारांनी जागरूकतेने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. जागरूक मतदार लोकशाही बळकट करतात. सक्षम लोकशाहीमध्ये मतदानाची टक्केवारी प्रचंड मोठी असते. मतदानाचा दिवस उत्सवासारखा साजरा केला जातो. तरुण मतदारांनी जागरूकतेने, जबाबदारीने आणि सजगतेने मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. यासोबत तरुणांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या संपर्कातील प्रत्येक मतदाराचे प्रबोधन तरुण मतदान करण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. मतदानाबाबतची निरसता, नैराश्य दूर केले पाहिजे. मतदानाचा दिवस म्हणजे सुट्टीचा दिवस असे न समजता आपली सर्व कामे सांभाळून मतदानाच्या दिवशी प्राधान्याने मतदान केले पाहिजे. दिनांक 26/04/2024 रोजी सकाळी 07 ते संध्याकाळी 06 या वेळेत सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे अशा प्रकारचे प्रबोधन तालुकास्तरीय मतदार जनजागृती व सहभाग कार्यक्रमाचे नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले स्वीप सदस्य मारोती घुगे, राजेंद्र ढाकणे यांनी केले. स्वीप पथकातील सदस्य आणि साहित्यिक मयूर जोशी खालील आशयगर्भ पोवाड्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. या पोवाड्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पुंगळा, पुंगळा तांडा,केंद्रीय प्राथमिक उर्दू शाळा जिंतूरचा परिसर या भागामध्ये चुनाव पाठशाळा, चौका-चौकात लोकशाही गप्पा, पथनाट्य याद्वारे स्वीप पथकाने मतदार जनजागृती केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मुरलीधर हजारे, अब्दुल माजीद, नांदुरे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी दत्तात्रय कुयरेवार, आढे, सर्व शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा वर्कर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमात नवमतदार, महिला मतदार, दिव्यांग मतदार, ज्येष्ठ नागरिक मतदार, आणि सर्वच मतदार मोठ्या संख्येने सहभागी झाले.



# बांधकाम विभागाचे नव्या वास्तूत कामकाज प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील म्हैसा रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाची नवीन सुसज्ज इमारत उभारण्यात आली असून प्रशासकीय कामकाजास प्रारंभ करण्यात आले आहे. अत्याधुनिक सुविधांनी बनविण्यात आलेल्या ईमारतीने शहराच्या वैभवात भर पडली आहे.

शहरात नवीन कार्यालयाच्या इमारती उभारण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याशिवाय उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालय, नगरपरिषद, विश्रामगृह,आयटीआय, न्यायालय,क्रीडा संकुलाची ईमारत उभारण्यात आली आहे. नवीन इमारत झाल्याने शहराच्या वैभवात भर पडली आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामकाज जून्या ईमारतीत सुरू होते.ईमारत जीर्ण झाल्याने श्री. चव्हाण यांनी नवीन वास्तू उभारण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे आज प्रशासकीय कामकाज नव्या वास्तूत सूरू झाले आहे. इमारतीत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे कक्ष, संगणक,लेखा विभाग व इतर स्वतंत्र कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे.यासाठी सुमारे साडेसहा कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.या शिवाय भोकर- म्हैसा रस्त्यावरील तेलंगणा सिमेलगत रहाटि पर्यंत शंभर कोटी रूपयांचा रस्ता प्रगतीपथावर आहे. न्यायालयाची इमारत पूर्णत्वाकडे आली आहे,राज्य मार्ग ४१९ व ४२३ सर्व प्रमुख जिल्हामार्गावरील खड्डे बुजविण्यात आले आहेत. बटाळा,कोळगाव,दिवशी,लगळूद,रावणगाव,नांदा,पिंपळढव,धारजणी येथील काम झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.




# तरुणाने गळफास घेऊन केली आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील सताळा येथील पोलीस ठाण्या हद्दीत एका 19 वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी फुलंब्री पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे. ऋषिकेश शिवाजी घुगे सताळा, असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे फुलंब्री पोलीस ठाण्याहद्दीत असलेल्या 19 वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, अद्याप कारण अस्पष्टच आहे.

# स्मरणवेदनांचे 'फुटवे'


आधुनिक केसरी

भावकवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या



'फुटवे' या काव्यसंग्रहाची पहिली आवृत्ती 13 ऑगस्ट 2007 रोजी जालना येथे प्रकाशित झाली होती. आज 'कवितेचा पाडवा' या कार्यक्रमात याच कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ती अधिक देखण्या रूपात प्रकाशित होत आहे. त्यानिमित्त यातील कवितांचे संक्षिप्त रसग्रहण...

कालपर्यंत
सागरगोटे,
फरशीच्या चिपा
आणि भुलाबाई
हीच ज्यांची
संपत्ती होती
अशा उमलत्या
कळ्यांची
तापल्या तव्यावर
पाय ठेवतानाही
कासाविशी व्यक्त करणारा 'फुटवे' हा संजीवनी तडेगावकर यांचा पहिला कवितासंग्रह. अस्ताव्यस्त




वाहणाऱ्या गर्दीत आपलं माणूस दिसावं तशा या कविता माणसाला आपलसं करतात आणि गाण्याचा झरा उरात घेऊन वावरतानाही प्रहार आणि विद्रोहाचे काठ या कवितेला सतत सोबत करतात.

***मन मातीच्या आळ्याचे***
***तुळशी मंजुळेचे रोप***
***चवतीच्या चांदण्याला***
***माझा चंदनाचा भूप***

असं झुळझुळू लिहितानाच हुंड्यासाठी सोयरीक मोडणाऱ्यांना ही कविता म्हणते,

***कावळ्यांना उच्ट्या***
***पत्रावळीवरची***
***शितं लागतात***
***निगुतीनं वाढलेलं***
***ताट नाही***

वर्ल्हाकडून येणाऱ्या पावसाने मनाचा घाट पायरीपायरीने ओलावत जातो तेव्हा कृष्णचिंतनानं सावळ्या झालेल्या राधेनं आणि अमर्याद वाट पाहणाऱ्या मीरेनं भोगलेल्या स्मरणवेदनांचे फुटवे वा कवितांमधून जागोजाग ***उगवलेले दिसतात.***

***बारवेच्या पायरीशी***
***तुझा प्रसादाला हात***
***माझ्या पूजेच्या ताटात***
***काळजाची फुलवात...***
***...यावर काय बोलणार?***

श्रावणातल्या घनाची अन उगवतीच्या उन्हाची वाट पाहणाऱ्या तरल स्त्रीमनाची खळाळती भावधारा हा या कवितांचा स्वभाव.

***उभी अंगणात***
***डोळे लावून***
***जीवाचा होऊन***
***गेला कुठे?***
***आणि***
***काल पुस्तकात तुझ्या नावाची***
***फुलपाकळी सापडली आणि***
***मीच माझ्यात हरवले***

अशा जीर्ण रुपेरी भूतकाळाचा भुगा होऊ नये म्हणून हलक्या हाताने पापुद्रे धरावेत तशा या ओळी जपाव्या लागतील आणि उद्याच्या समर्थ भावकवितेपर्यंत पोचायला 'फुटवे' सारख्या फुलवाटांना दिशाही पुसावी लागेल. श्रीधर अंभोरे यांचं मुखपृष्ठ आणि रेखाटने पाहून आपल्याला डोळे असल्याचा आनंद तर होतोच, पण दुधावरल्या सायीनं अक्षररूप घेऊन भेगाळलेल्या मनाला स्नेहन द्यावे तशा या 'हमदर्द' कविता पहाटेच्या दवागत वाचकाला सुस्नात करतात.

विनोद जैतमहाल

## जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी गव्हाचा काड जाळू नका : डॉक्टर अशोकराव ढगे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील अनेक ठिकाणी या पंधरा दिवसात



गव्हाची मोठ्या प्रमाणात काढणी चालू आहे लवकरच्या गव्हापेक्षा उशिरा पेरणी केलेल्या गव्हाच्या उत्पादनात योग्य वाढ झाल्याचे आढळून येत आहे.जमीनीत सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी गव्हाचा काड जाळू नका असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

डॉ.ढगे म्हणाले की बहुतांशी शेतकरी गव्हाची सोंगणी हार्वेस्टर मशीनच्या साह्याने करत आहेत त्यामुळे शेतामध्ये मोठ्या प्रमाणात गव्हाचा काड शिल्लक राहतो आपल्या जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब कमी झाला आहे त्यासाठी जमिनीत जास्तीत जास्त सेंद्रिय पदार्थ गाडले पाहिजेत त्यामुळे गव्हाचा काड हे सोन्यासारखे महत्त्वाचे आहे कारण जमिनीची ती भूक आहे व त्यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारते जमीन भुसभुशीत होते.

जमिनीत हवा खेळती राहते जमिनीचा निचरा सुधारतो व विशेषतः जमिनीतील जिवाणूंना अन्न मिळते या सर्व फायद्यासाठी जमिनीमध्ये गव्हाचा काड गाडवा तो जळू नये गव्हाचा काड जाळल्यामुळे जमिनीचे तापमान वाढते जमीन घट्ट होते व जिवाणू मरतात हे सर्व तोटे होतात तेव्हा शेतकरी बंधूंनी गव्हाचा काड जाळू नये असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी केली आहे.

## लोकनेते स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील पतसंस्थेला ४७ लाख रुपयांचा नफा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यात अग्रेगण्य समजल्या जाणाऱ्या नेवासा



येथील स्व-भांडवली लोकनेते स्वर्गीय मारुतराव घुले पाटील पतसंस्थेने सर्व तरतुदी करत सुमारे ४७ लाख रुपयांचा नफा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात झाला असल्याची माहिती लोकनेते स्व.मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन श्री नंदकुमार पाटील यांनी दिली. संस्थेकडे गत आर्थिक वर्षाअखेर ७८ लाख भाग भांडवल ४७ कोटी १७ लाख ५७ हजाराच्या ठेवी, ३१. कोटी २० लाख १९ हजाराचे कर्ज वाटप व १९ कोटी ७१. लाख २४ हजार गुंतवणुक असून स्वभांडवली संस्थेच्या मालकीचे १२ गाळे व साडे बारा एकर जागा आहे. संस्थेचे संगणकीकृत व्यवहार व वातानुकुलीत कार्यालय आहे. संस्थेने ११ कोटी रुपयाचे सोने तारण कर्ज वाटप केले असून सोने तारण कर्ज सुविधा दररोज ऊपलब्ध आहे. तसेच संस्थेने नेहमीच सामाजीक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात योगदान दिले असल्याचे श्री नंदकुमार पाटील यांनी सांगितले.

लोकनेते स्वर्गीय मारुतराव घुले पाटील पतसंस्थेच्या यशस्वी वाटचालीसाठी सर्व संचालक, सभासद, खातेदार,ठेवीदार कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य मिळत असून सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवूनच पतसंस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे श्री नंदकुमार पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

## महिला आयोगाच्या कार्यालयाचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचारासाठी गैरवापर : संध्या सव्वालाखे

### सरकारी कार्यालयाचा प्रचारासाठी वापर करणाऱ्या चाकणकरांवर कारवाई करा



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी तसेच महिलांच्या हक्कासाठी महिला आयोग काम करत असते. परंतु महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यालयाचा वापर आता राजकीय कार्यक्रमासाठी केला जात असून महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर या आयोगाच्या कार्यालयातूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराचे काम आहेत, त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे म्हणाल्या की, महिला आयोगाचे अध्यक्षपद हे संवैधानिक पद आहे, महिला आयोगाच्या कार्यालयातच आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकरणकर यांनी पक्ष प्रचाराचे काम करून पदाची प्रतिष्ठा धुळीस मिळवली आहे.पक्ष प्रचाराचे काम वरिष्ठाच्या दबावाखाली करावे लागत आहे का, हे रुपाली चाकणकर यांनी स्पष्ट केले पाहिजे. चाकणकर या दडपणाखाली पक्ष प्रचाराचे काम करत असतील तर ते अयोग्य व चुकीचा पायंडा पाडणारे व असंवैधानिक आहे. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी जे कार्यालय आहे त्या कार्यालयातून राजकीय प्रचाराचे काम व्हायला नको. याप्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करून रुपाली चाकरणकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करत असल्याचे संध्याताई सव्वालाखे यांनी स्पष्ट केले.

## कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपचं शिंदेंवर दडपण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कल्याण लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी भाजप नेते व उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केली. यावरूनच दिसून येते की एकनाथ शिंदे यांच्यावर भाजपचा किती दबाव आहेत. स्वतःच्या मुलाची आणि स्वतःच्या पक्षाच्या उमेदवाराची मुख्यमंत्री शिंदे घोषणा करू शकले नाही किंबहुना भारतीय जनता पार्टीने त्यांना तसा अधिकार दिला नाही अशा शब्दात महेश तपासे मुख्य प्रवक्ता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) यांनी फडणवीस व शिंदे यांच्यावर टीका केली.

महेश तपासे म्हणाले की, भिवंडी लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार कपिल पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे मात्र आता शिंदे शिवसेना गटाचे स्थानिक सर्व पदाधिकारी कपिल पाटील यांना विरोध करीत आहेत व त्यामुळे कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघांत महायुतीमध्ये अंतर्गत वाद सुरू आहे व पराभवाचे लक्षण दिसत आहेत असे महेश तपासे म्हणाले.

संजय निरुपम यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर ते आता शिंदे सेनेचे स्वयंघोषित प्रवक्ते झाले आहेत. काही कर्तुत्व शून्य नेत्यांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करणे हेच योग्य आहे असा टोला महेश तपासे यांनी लगावला. महाविकास आघाडीच्या उमेदवारांची यादी घोषित होताच काही उमेदवारांवर शासकीय यंत्रणांची कारवाई सुरू झाली व हे सर्व राजकारणापोटी आहे असा हल्लाबोल तपासे यांनी केला.

## दुष्काळी अनुदानास ई-केवायसीचा खोडा; बळीराजा वंचित..!

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

धाराशिव : राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यामध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. मराठवाड्यातील पावसाने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया सुरू असतानाच, अधिकाऱ्यांकडून बँक खात्यांचे ई-केवायसी अनिवार्य केले आहे. ई-केवायसी प्रक्रियेनंतर, ज्यामध्ये आधार कार्डशी जोडलेली नोंदणीकृत बँक खाती समाविष्ट असतात, शेतकऱ्यांना जनरेट केलेल्या कोडचा वापर करून मदत मिळणे अपेक्षित आहे. धाराशिव जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधीतील प्रजन्यमान लक्षात घेता वाशी,लोहारा व धाराशिव या तीन तालुक्यांमधील सुमारे १लाख ६४ हजार २५९ शेतकऱ्यांना २०८ कोटी ५०लाख ७७ हजार रुपयांच दुष्काळी अनुदानाची शासकीय मदत मंजूर करण्यात आली आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांना ही केवायसी साठी अंगठा लावून औपचारिकता पूर्ण करण्यात अडचणी येत असल्याची तक्रार शेतकरी वर्गातून केली जात आहे. मध्यवर्ती पोर्टल्समधील तांत्रिक



अडचणी अधिकाऱ्यांनीही मान्य केल्या आहेत. विहित कार्यपद्धतीनुसार, दुष्काळी तालुक्यातील तहसील कार्यालयांना लाभार्थी शेतकऱ्यांची यादी अपलोड करावी लागते, त्यानंतर एक कोड तयार केला जातो जो तलाठी-स्तरीय कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांना प्राप्त करावा लागतो. ई-केवायसी संबंधित तक्रार घेऊन शेतकरी शासकीय कार्यालयात आला असता अधिकाऱ्यांकडून ते वरिष्ठ स्तरावरील अडचण आहे.आता ऑनलाईन प्रक्रिया झाली आहे.आमच्या हातात काही नाही,असे वारंवार उत्तर दिले जाते.

बहुतांश शेतकऱ्यांना तर ई-केवायसीच्या किचकट प्रणालीमुळे 2022 चे सततच्या पावसाचे अनुदान देखील आजता गायत मिळाले नाही. त्यामुळे अनेक शेतकरी सततच्या पावसाच्या अनुदान असो,दुष्काळी अनुदान असो किंवा इतर शासकीय मदत असो यापासून वंचित राहत आहे. यासाठी शासनाकडून शासकीय मदतीपासून किंवा अनुदानापासून ई-केवायसी मुळे वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर सुरू करण्याची मागणी होत आहे.

धाराशिव जिल्ह्याचे नैसर्गिक आपत्तीचे अव्वल कारकून नितीन चौधरी म्हणाले की, शेतकऱ्यांना ई-केवायसीशी संबंधित समस्या येतं आहेत.याबद्दल व्हाट्सअप वर ग्रुप वर तक्रारी येत आहेत.वरिष्ठ स्तरावर चौकशी करून लवकरच ई-केवायसी सुरू करण्यात येईल.

# जानेफळच्या शारदाची तलाठी, कृषी सहायक, बँक कृषी अधिकारीपदाला गवसणी

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभूवन**

**वैजापूर :** 'अपयश ही यशाची पहिली पायरी असते" हा सुविचार नेहमी आपण ऐकत आलोय. हाच सुविचार सत्यात उतरवला तो म्हणजे वैजापूर तालुक्यातील जानेफळ येथील शारदा कैलाश त्रिभुवन या मेहनती जिद्दी आणि कष्टाळू मुलीने हा सुविचार सार्थकी ठरवला आहे. शारदा हिने वैजापूर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तिने एका पाठोपाठ तीन स्पर्धा परीक्षा पास करत तालुक्याचे नाव उंचावले आहे. स्वतःच्या हळदीच्या दिवशीच तिचा तलाठी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि त्यात ती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून मुलींमध्ये प्रथम आली होती. त्यानंतर कृषी सहायक यात पण ती पास झाली. हा आनंद उत्सव सुरू होता तेच काही दिवसांनी IBPS स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि अपेक्षेप्रमाणे यात ही ती चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. फक्त तिने त्रिभुवन कुटुंबच नाही तर ज्या घरी सून म्हणून गेली त्यांचे देखील नाव उंचावले आहे. सर्व गावकरी तसेच सर्वच स्थारतून तिचे कौतुक केले जात आहे. खर तर तालुक्यांतीलच नव्हे तर संपूर्ण तरुणींसाठी ती एक आदर्श ठरली आहे. एकीकडे अंगाला हळद लागली तर दुसरीकडे तलाठी पास झाली म्हणून



गुलाल देखील उधळला गेला. तिच्या स्वप्नांना आणि पंखांना बळ मिळाले होते. म्हणू इतक्यावरच न थांबता पुढे देखील तयारी सुरू ठेवली आणि क्लास टू ची पोस्ट मिळे पर्यंत तिने हार मानली नाही अशा जिद्दी धाडशी आणि कष्टाळू शेतकऱ्याच्या मुलीची संघर्ष कथा आज आपण वाचणार आहोत. खरतर शारदा हीचा हा सामान्य कुटुंबातील मुलगी ते अधिकारी हा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. अतिशय खडतर आणि गरीब घरातील ही मुलगी स्वकष्टाने इथपर्यंत आली. मात्र या संघर्षात तिला आजोबा, वडील आणि तिचे काका या सर्व वडीलधाऱ्या व्यक्तींची मोलाची साथ मिळाली. शारदा ही लहानपणापासूनच अगदी हुशार आणि चानांक्ष मुलगी होती. तिला आई वडील आणि आजी आजोबा यांच्या कष्टाची जाणीव होतीच यातूनच तिने प्रेरणा घेऊन अधिकारी होण्याचं स्वप्न पूर्ण केलं. हार मानायची नाही हे बाळ कडू आजोबांकडून तिला मिळाले होते. आजोबा हे हाडाचे शेतकरी त्यामुळे निसर्ग साथ देईल किंवा नाही पण जिद्द कायम होती की पीक यावेळी चांगल पिकवणारच तसेच शारदा हिने देखील ठरवलं होत अपयश किती ही आले तरी ते पचवून पुढे यश मिळवणारच.

आजोबांचे कोणते शिक्षण नसताना आपल्या नातीला कायम प्रोत्साहन दिले आहेत. विशेष म्हणजे शारदा बालपणापासून उशार असल्याने त्यांनी तिला अधिकारी बनविण्याचे स्वप्न रंगवले होते. ते तिने देखील सत्यात उतरवले.

तिचे पदवी पर्यंतच्या शिक्षण गावाकडे च पूर्ण झाले. विशेष म्हणजे रोज तिला महाविद्यालयात जाण्यासाठी तब्बल पन्नास किलमीटर चा प्रवास करावा लागत असे. प्रवसात खूप वेळ जात असल्याने तिला अभ्यासाला देखील वेळ मिळत नव्हता. दैनंदिनी ती एसटी बस ने प्रवास करत. घरापासून एस टी बस पर्यंत ती तीन किलमीटर पायी चालत जात होती. इतका खडतर प्रवास करून तिने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. फक्त पूर्णच केले नाही तर तिने चांगले गुण देखील मिळवले. पुढे तिने बीएससी ॲग्री साठी परभणी इथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात प्रवेश घेतला. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना तिने यूपीएससी या स्पर्धा परीक्षा करण्याचा निर्णय घेतला. मात्र तिला यूपीएससीमध्ये म्हणावं तसं यश मिळालं नाही. त्यानंतर पुढे तिने एमपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली त्यात शारदा ने मुलाखतीपर्यंत मजल ही मारली पण 99% कष्ट आणि एक टक्के नशिबात ते साथ सोडली. मात्र हर मनाने हे शारदाच्या तत्वात नव्हते. तिने प्रयत्न सुरू ठेवले. एमपीएससी सोबतच बँकिंगची ही तयारी ती करतच होती. पुढे तिने आयबीपीएस या स्पर्धा परीक्षेची तयारी केली त्यात तिला यश देखील आले दोन वेळा तिने इंटरव्यू दिले मात्र फक्त एक मार्क कधी 50% पॉईंट ने असे तिच्या हातातून या पोस्ट गेल्या. दोन वेळा इंटरव्यू पर्यंत जाऊन यशाने तिला हुलकावणी दिली होती. मात्र तिने यावेळी मनामध्ये चंगच बांधला होता की पदाला गावासनी घालणारच आणि तिने करूनही दाखवले. यश अपयश हे दैनंदिन आयुष्याचा जुना भागच बनले होते त्यात कधी खचनं तर कधी पुन्हा नव्याने उभारी घेणं सुरू होत यात तिला मोलाची साथ मिळाली ती म्हणजे तिच्या कुटुंबाची. सर्वांनी तिला हिम्मत दिली आणि पुन्हा जोमाने अभ्यासाला लागण्यास सांगितले. शारदा एक दिवस नक्की मोठी अधिकारी बनणार हा विश्वास त्रिभुवन कुटुंबीयांना होताच पण त्यातच नातेवाईकांनी तिच्यासाठी स्थळ सुचवायला सुरुवात केली. याच दरम्यान घरच्यांच्या मना प्रमाणे स्थळ आले आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला पण याच काळात तिने देखील परिपूर्ण मेहनतीने पेपर दिले होते. ज्याचे फळ मिळेल हे तिला चांगलच ठावूक होते. त्यामुळे तिने ही लग्नाला होकार दिला. तिच्या आणि कुटुंबाच्या अपेक्षा प्रमाणे हळदीच्या दिवशीच ती तलाठी परीक्षेत उत्तीर्ण झाली होती. त्यामुळे घरच्यांचा आनंद हा गगनात मावेनासा झाला होता. मात्र शारदा ही आजुन वाट बघत होती मोठ्या पदाची त्यामुळे तिने जास्त काही कोणाला सांगू नका अस सांगितलं. शेवटी स्वप्न मोठी बघितली होती आणि ती पूर्ण होणार जणू तिला ठाऊकच होते. पुढे पंधरा दिवसातच कृषी सहायक पदी तिची निवड झाल्याची बातमी आली. विशेष म्हणजे तिच्या मनाप्रमाणे पदाचा निकाल येण्यास थोडा उशीर झाला पण तो दिवस ही आला आणि ती IBPS परीक्षेत उत्तीर्ण झाली. एकाच वेळी तिने जवळपास तीन सरकारी पदांवर मजल मारली होती. त्यामुळे ही आता अनेक मुलींची आयकॉन झाली आहे. तिच्या या यशात तिची आई, वडील आजी आजोबा आणि काका, काकू यांचा नक्कीच सिंहाचा वाटा आहे. यात शंकाच नाही. मात्र तिची मेहनत आणि कष्टात असलेल्या सतत्यमुळे तिने हे यशोशिखर सर केले आहे. शारदा सध्या वैजापूर तालुक्यातील हमरापुर इथे तलाठी पदावर कार्यरत आहे. शारदा आज अनेक ग्रामीण भागातील मुलींच्या गळ्यातील ताईत बनली आहे. अशा एकूणच तिचा संघर्ष आणि खडतर प्रवास होता.



# 'कष्टाच्या वाटा' बालकथासंग्रह शाळेला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांचा शाळेतील मुला-मुलींना वाचनीय असलेला व बालमनावर सुसंस्कार करणारा अतिशय दर्जेदार बाल कथासंग्रह "कष्टाच्या वाटा " हे पुस्तक गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर ता. जि. संभाजीनगरातील साजापूर जि. प. उच्च प्राथमिक शाळा आणि वडगाव कोल्हाटी येथील जि. प. शाळा, या शाळेला लेखक अय्युब पठाण यांनी कथासंग्रह भेट म्हणून दिले. या प्रसंगी वडगाव कोल्हाटी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुनील चिपाटे, तसेच साजापूर जि. प. शाळेचे मुख्याध्यापक श्री. धनंजय नागमवार यांनी " कष्टाच्या वाटा " या बाल कथासंग्रहाची प्रती भेट स्विकारून लेखक आणि पुस्तकाचे स्वागत केले. याप्रसंगी शिक्षक- सचिन वाघ, ( तालुका शिक्षक सेनेचे अध्यक्ष) भास्कर गोपाळ, तसेच बिडकीन येथील शिक्षक अनिल जाधव, देविदास काळे, आणि प्रख्यात साहित्यिका तथा उपक्रमशील शिक्षिका श्रीमती अलकनंदा घुगे- आंधळे, मनिषा ढवळे, अश्विनी मोरे, रेणूका शिंदे आणि शाळेतील विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वाळूज शहर उपविभागात प्रकाशदूतांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या वाळूज शहर उपविभागातील वर्षभरात उत्कृष्ट काम करणाऱ्या जनमित्रांचा तसेच यंत्रचालकांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर शहर मंडल कार्यालयांतर्गत वार्षिक वीज देयक वसुलीमध्ये वाळूज शहर उपविभागाने सर्वोत्तम कामगिरी केली आहे. हे यश वाळूज शहर उपविभागातील सर्व जनमित्र, अभियंता व बिलिंग कर्मचारी यांच्या एकजुटीने केलेल्या प्रयत्नाचे फळ आहे, असे प्रतिपादन उपविभाग प्रमुख प्रवीण जोशी यांनी यावेळी केले.

ग्राहकांना तत्पर सेवा तर द्यावयाचीच आहे पण त्यासोबत आपल्या सहकाऱ्यांच्या व ग्राहकांच्या सुरक्षिततेचीही आपल्याला तेवढीच दक्षता घ्यायची आहे. सुरक्षिततेच्या साधनांचा काटेकोरपणे वापर करणे आपले प्रथम कर्तव्य आहे. त्यानेच 'अपघातमुक्त महावितरण' हे ध्येय आपण गाठू शकतो, असे प्रतिपादन सुरक्षा प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख एच. ए. खान यांनी केले. आपले कर्तव्य सक्षमपणे पार पाडणाऱ्या व आपल्या सेवाकाळात अपघातमुक्त सेवा देणाऱ्या उपकेंद्रातील यंत्रचालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. शून्य थकबाकी उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या दीपक थट्टेकर व केशव कड या जनमित्रांचा यावेळी विशेष प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास उपविभागातील अधिकारी, अभियंते रवी मिरगणे, विक्रांत खाडे, सुरक्षा अधिकारी दांडगे, हातकंगणे, अर्शद खान पठाण, डॉ.कृष्णा काळदाते व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# मोदी सरकारने छत्रपती शिवरायांचे हिंदवी स्वराज्य स्थापित केले : मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ



आधुनिक केसरी न्यूज

**हिंगणघाट :** 'फिर एक बार मोदी सरकार' आणि 'अब की बार, 400 पार' चा नारा देत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महायुती उमेदवार खा. रामदास तडस यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचा हुंकार वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे सोमवारी झालेल्या प्रचार सभेत भरला. मोदी सरकारने छत्रपती शिवरायांचे हिंदवी स्वराज्य ख-या अर्थाने स्थापित केले आहे असे सांगत योगी आदित्यनाथ यांनी भाजपा पुन्हा बहुमत मिळवणार आणि महाराष्ट्रातील सर्व जागांवर महायुती उमेदवार विजयी होणार, असा विश्वासही व्यक्त केला. या प्रचार सभेला माजी केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते, आ.समीर कुणावार,पंकज भोयर, प्रताप अडसड, जिल्हाध्यक्ष सुनील गफाट आदी उपस्थित होते. योगी आदित्यनाथ म्हणाले की, मोदी सरकारने 10 वर्षांत सर्वांगीण विकास साधत देशाला जगात नवी ओळख निर्माण करून दिली आहे. भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. भारताकडे आदराच्या नजरेने पाहिले जात आहे. दहशतवादाचा बिमोड करत मोदी सरकारने सामर्थ्यशाली देश अशी भारताची नवी ओळख जगात निर्माण केली आहे. शत्रू राष्ट्रांची आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत नाही. मोदी सरकारमुळे कणखर भारताची नवी प्रतिमा जगासमोर आली असून पाकमध्ये घुसून दहशतवादाचे समूळ उच्चाटन करू असेही आदित्यनाथ यांनी सांगितले. मोदी सरकारने समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सरकारी योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. विकासाची नवनवी शिखरे भारत सर करत आहे. एनडीए कडे नरेंद्र मोदीं सारखा कणखर नेता आहे, विकासाची निती आहे आणि गरीब कल्याणाची नियत ही आहे. विकसित भारताचा संकल्प मोदी यांनी केला असून विकसित भारत जर हवा असेल तर विकसित महाराष्ट्र हवा,विकसित महाराष्ट्र बनवायचा असेल तर विकसित नागपूर हवे असेही ते म्हणाले. 2024 च्या निवडणूकी आधीच जनता ही पंतप्रधान मोदींच्या गॅरंटीबाबत आश्वस्त असून मोदीजींच्या विजयाची खात्री आहे असे त्यांनी नमूद केले. 26 एप्रील पर्यंत प्रत्येकाने महायुतीचे उमेदवार रामदास बनून घरोघरी जाऊन मोदी सरकारच्या कार्याबाबत माहिती द्या असे आवाहन ही त्यांनी केले.

# शिर्डी शहरात भिकाऱ्यांविरोधात पोलीस कारवाई; ९० भिकाऱ्यांची धरपकड

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** कमी श्रमात जास्त पैसे मिळतात व मोफत चे भोजण सहजपणे मिळणारा निवारा व सहजपणे रोख रक्कम कपडे किराणा असे साईभक्त भाविक यांच्या कडून मिळणारे दान त्यातून भक्तांची पुण्य मिळत असल्याची धारणा म्हणून शिर्डी शहरात मोठ्या प्रमाणावर भिक्षेकरी परजिल्ह्यातील. येत असतात तर काही टोळ्या वेगवेगळ्या जिल्ह्यातील रेल्वे स्थानके बसस्थानक या ठिकाणी शोध घेऊन आपल्या आर्थिक फायद्यासाठी घेऊन येतात यात अपंग वयोवृद्ध नशेच्या आहारी गेलेले वय वाढलेले अशा स्त्री पुरुष यांचा समावेश असतो यात काहींची परिस्थिती. चांगली असताना नातु किंवा भल्या सकाळी आणुन सोडतात दिवसभर भिक्षा मागणे रात्री नशापाणी करुन. मिळेल तेथे झोपी जाणे अशा प्रकारात वाढ होत असल्याचे पोलिसांनी लक्षात येताच रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी शहरात होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगाने जिल्हा पोलिस प्रमुख राकेश ओला उपविभागीय अधिकारी शिरिष वमणे पोलीस निरीक्षक रामचंद्र कुंभार व शिर्डी नगर पंचायत व साईबाबा संस्थान सुरक्षा विभाग व शिर्डी पोलिसांनी सोमवार दिनांक ८एप्रिल रोजी केलेल्या मोठ्या कारवाईत साईभक्त भाविकांना वेठीस धरणारे भिक्षा मागणारे पाठलाग करणारे असे जवळजवळ ९०स्त्री पुरुष यांना पकडण्यात आले त्यांची सावळीविहीर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाने पोलीस स्टेशन मध्ये वैद्यकिय तपासणी केली तसेच त्यांना पोलीसानी चहा पान नाष्टा यांची व्यवस्था करुन उशीरा राहता न्यायालयात हजर केले असता पुढील आदेश होई पर्यंत न्यायालयाच्या आदेशाने महिलांची रवानगी चेंबूर येथील भिक्षेकरी ग्रृहात तर पुरुषांची विसापूर येथे पाठविण्यात येणार आहे हि कारवाई मुंबई पोलीस भिक मागणे प्रतिबंधक अधिनियम १९५९ कलम ५(५) प्रमाणे जवळपास ९०जणावर कारवाई करण्यात आली आहे या कारवाईत सपोनी सागर काळे पपु कादरी ,कायदे तसेच पोलिस कर्मचारी बाबा खेडकर गजानन गायकवाड गणेश घुले अन्ना दातीर गणेश बोरसे रक्षा निकाडे अर्चना ठोके प्रमिला सहाणे यांनी भाग घेतला कारवाई होताच अनेक भिक्षेकरी परागंदा झाले होते साईबाबा मंदिर शिर्डी बसस्थानक व लगतच्या परिसरात अशा भिक्षेकरी लोकांची वाढती संख्या अनेक यत्रनेना त्रासदायक ठरत होती अशाच प्रकारे लपून छपून तर कधी राजरोसपणे वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या देखील वाढत असुन पोलीसांनी त्या विरोधात देखील मोठी मोहीम सुरू करावी अशी मागणी काही जागरूक. नागरिकांनी केली आहे.

# सावळदबारा मतदारसंघात भाजप स्थापना दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व डाभा येथे शनिवारी शांताराम खराटे यांच्या येथील कार्यालयात भाजप स्थापना दिनाच्या निमित्ताने खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सर्वप्रथम स्व पंडीत दिनदयाळ उपाध्याय व श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला भाजपाचे कार्यकर्ते यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.भारतीय जनता पक्षाच्या ४४ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने सावळदबारा मतदारसंघात परिसरात शनिवारी (दि.६) विविध कार्यक्रम आयोजित करून स्थापना दिन उत्साहात साजरा केला. विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहीती अनुसूचित जाती जमातीचे तालुका अध्यक्ष शांताराम खराटे यांनी दिली. येथील कार्यालयात भाजप स्थापना दिनाच्या निमित्ताने खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात भाजप स्थापना दिना निमित्ताने आजपासून पुढचा एक आठवडा मतदारसंघात विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहीती आमदार आमोणकर यांनी दिली. 'सोशल जस्टीस वीक' च्या नावाखाली ते विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार असून त्यात स्वच्छता मोहीम, मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर, वॉल पेंन्टींग अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असणार आहे.सावळदबारा मतदारसंघात भाजप तर्फे ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात येणार असल्याची माहीती शांताराम खराटे यांनी दिली. तसेच १४ एप्रिल रोजी मतदारसंघाच्या सर्व बुथांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जंयती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहीती तालुका अध्यक्ष गणेश लोखंडे यांनी दिली. तसेच अन्य विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



भाजप स्थापना दिनाचे औचित्य साधून डाभा व सावळदबारा मतदारसंघातील भाजप युवा मोर्च्याची समिती जाहीर केल्याची माहीती दिली भाजप युवा मोर्च्यांने स्थापना दिनाच्या निमित्ताने पुढच्या एका आठवड्यात गोव्याच्या विविध भागात विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहीती दिली.

मतदारसंघात भाजप स्थापना दिना निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केल्याबरोबरच २०२४ पुढच्या होणा या लोकसभा निवडणूकीच्या तयारीची सुरवात केल्याची माहीती माजी सरपंच भाऊराव कोलते पाटील यांनी दिली. सावळदबारा मतदारसंघातून सर्वांत जास्त मते मिळवून देण्याचे आमचे लक्ष असणार असून त्यात आम्ही यशस्वी ठरणार असा विश्वास माजी सरपंच ईश्वर कोळपे बूथ क्र 56,57, डाभा बूथ क्र 47 यांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष गणेश भाऊ लोखंडे,अ जाती तालुका अध्यक्ष शांताराम खराटे,' जिल्हा प्रकोष्टश्री भाऊराव कोलते, विनोद टिकारे तालुका उपाध्यक्ष ईश्वर कोळपे,नंदू शेळके,पंढरी साबळे,तालुका उपाध्यक्ष किसान मोर्चा युसुप पठाण अल्पसंख्यांक जिल्हा सदस्य दीपक मानकर, ईश्वर भुसारे, रामचंद चिमणकर, संजू राजपूत,शरीफ तडवी,गजानन गट, रमेश गावडे व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात न्यू हायस्कूल द्वितीय

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता आणि शाळा परिसराचा विकासात्मक कायापालट करण्यासाठी घेतलेल्या "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या उपक्रमात तालुकास्तरावरील द्वितीय क्रमांक मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैजापूर येथील न्यू हायस्कूलने पटकावला. गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने जिल्हा परिषद व खासगी शाळेतील विद्यार्थ्यांत शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करण्यासाठी पालक-शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण करण्यासाठी अभियान राबविण्यात आले होते. या अभियानात जिल्हा परिषदेतील, ३४० शाळा व खाजगी १०६ शैक्षणिक संस्थानी सहभाग घेतला होता.

अभियानात गुणवत्ता वाढीसाठी दृष्टीने अध्ययन, अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांत आवड निर्माण होऊन सहज व सुलभ शिक्षण मिळावे, पर्यावरण संवर्धन जनजागृती व्हावी व सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे व्यवसाय शिक्षणाची तोंड ओळख व्हावी. अंगभूत कलागुणांचा विकास या उपक्रमाची अंमलबजावणी न्यू हायस्कूल शाळा समिती अध्यक्ष भगवाननाना तांबे, मुख्याध्यापक एस एस शिंदे व शिक्षकांनी केली.तालुकास्तरीय मूल्यांकन समिती मार्फत तपासणी केली. गटशिक्षणधिकारी यांनी खाजगी व्यवस्थापनात प्रथम क्रमांक भागीरथी विद्यालय नालेगाव, द्वितीय क्रमांक न्यू हायस्कूल वैजापूर, तृतीय क्रमांक न्यू हायस्कूल नागमठाण शाळेने पटकावल्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यातील खाजगी व्यवस्थापनातील १०६ शाळांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील नियम व विशेष उपक्रम राबवण्यात न्यू हायस्कूल वैजापूर व न्यू हायस्कूल नागमठाण या दोन्ही शाळेचे अध्यक्ष भगवाननाना तांबे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकवृंद, व्यवस्थापन समिती सदस्य, विद्यार्थ्यांच्या प्रतिसादामुळे दोन परितोषिक जिंकण्याची कामगिरी केली.



# 'सिझर न झालेल्या कविता' संग्रहास सोलापूरचा साहित्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मेहकर येथील सुप्रसिद्ध कवी डॉ.सुनील श्रीराम पवार यांच्या 'सिझर न झालेल्या कविता' या संग्रहाला अंकुर साहित्य संघ सोलापूरचा कवी नागनाथ गायकवाड राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सोलापूर येथील समाजकल्याण केंद्राच्या सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक प्रा. राजेंद्र दास, सहा. कुलसचिव शिवाजीराव शिंदे, दै. पुण्यनगरीचे उपसंपादक भरतकुमार मोरे, जिल्हाध्यक्ष नागनाथ गायकवाड, नसीम पठाण मॅडम यांच्या हस्ते डॉ. पवार यांना साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, स्मुर्ति चिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

यापूर्वी डॉ सुनील पवार यांच्या 'सिझर न झालेल्या कविता' संग्रहाला जीवन प्रणाली प्रतिष्ठान बीडचा काव्यगौरव पुरस्कार, माय-बाप प्रतिष्ठान टेंभुर्णी (ता. माढा) साहित्यभूषण पुरस्कार, उज्वल साहित्य प्रतिष्ठान नांदेडच्या साहित्यरत्न पुरस्काराने गौरवण्यात आलेले आहे.



माझ्या 'सिझर न झालेल्या कविता' संग्रहाला अंकुर साहित्य संघ सोलापुराचा साहित्य गौरव पुरस्कार मिळाल्याचा मला आनंद होतोय . मात्र पुरस्कारही तिरस्कार वाटावेत असा हा काळ आहे . परंतु पारदर्शकता, दर्जा आणि निखळ गुणवत्तेच्या बळावर साहित्यकृतीला पुरस्कृत करणाऱ्या महाराष्ट्रात बोटावर मोजण्याइतक्याच संस्था , साहित्य संघ आहेत . त्यापैकीच अंकुर साहित्य संघ असल्याचा मला अभिमान आहे . माझ्या कवितेत पानं , फुलं निसर्ग जास्त आला नाही . कारण वेदनेशी माझं नातं अतूट आहे . मला वेद कळत नाही पण वेदना कळतात . म्हणून गरिबीच्या धगीतूनच माझ्या कविता जन्माला आल्या आहेत . त्यासाठी मला प्रतिभेच्या उसन्या कळा आणाव्या लागल्या नाही . जे भोगलं , जे बोचलं , जे सुचलं तेच कवितेत माडलं अगदी सहज सिझर न करता . **डॉ . सुनील पवार**

# खुश्कीच्यामार्गे समृद्धी गाठून अवैध वाहतूक

## प्रवासी वाहने, रेशन माफिया, रेती वाहतुकीसाठी होतोय खुश्कीच्या पाणंद रस्तामार्गे समृद्धी महामार्गाचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** समृद्धी महामार्गाने उपराजधानी ते राजधानी मधील अंतर कमी झाला त्या सोबतच एकाच मार्गाला 11 जिल्हे जोडल्या गेलीत त्याने या मार्गावरील येणाऱ्या परिसरात कित्येक व्यापाराला चालना मिळाली तर कित्येकांना जलद गतीने उपचारासाठी नेता आल्याने प्राण सुद्धा वाचले सध्या मात्र याच समृद्धी महामार्गावरील टोल नाके चुकवन्या साठी खुशकीचा रस्ता पांदन मार्गे समृद्धी महामार्गावर जावून अवैध प्रवासी वाहतूक, रेशन माल वाहतूक, रेती वाहतूकी साठी जास्तीत जास्त प्रमाणात समृद्धी महामार्गाचा वापर होतं आहे ज्याने थेटपणे वाम मार्गासाठी याचा वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. समृद्धी महामार्ग हा नागपूर ते मुंबई अश्या समृद्धी महामार्गामुळे मुंबई ते नागपूर या दरम्यानचा प्रवास हा तब्बल १७ तासांवरून ७ तासांवर आला राज्यातील १० जिल्ह्यातील २६ तालुक्यातील ३९१ गावामधून हा महामार्ग जात असून ज्याने "घंटो काम मिनटों " होत असून वैध कामासाठीचं नव्हेतर खुशकीच्या मार्गाने या रस्त्यावर सध्या अवैध कामे सुद्धा जोमात सुरु आहे मेहकर वरून समृद्धी महमार्गाने जर संभाजीनगर गाठायचे असेल तर मेहकर एक्सचेंज वरून गाडी टाकावी लागते ज्याला मेहकर पासून टोल नाका सुरु होतो मात्र अवैध खुशकीचा मार्गा साठी सुलतानपूर 5 किमी अंतरावर असलेल्या धानोरा राजनी मार्गे अंडर पास खालून सरळ



समृद्धी मार्गावर चढल्या व उतरल्या जाते याचा पुन्हा एक फायदा म्हणजे समृद्धी महामार्गावरील कित्येक वाहन चालकांना धानोरा गावाजवळ ग्रीन नेट टाकून बनवलेल्या जागेवरून अवैध देशी मिळते त्याने हे वाहन धारक लघु शंका किव्हा शौचास जाण्याच्या बहाण्याने वाहने उभी करून देशी दारू विकत घेतात व त्याच खुशकीच्या मार्गा वरून प्रवासी वाहने, रेती वाहतूक करणारे वाहने,रेशन माफिया,गुटखा, अवैध दारू वाहतूक यांनी आपले साम्राज्य चालवत असल्याची माहिती सूत्रा कडून मिळाली विशेष म्हणजे यावर कोणतीही पाळत नसल्याने बिना बोभाटा सुलतानपूर ते मुंबई तर इकडे नागपूर परियंत हा अवैध खुशकीचा मार्ग चालत आहे ज्यावर कोणतीही रोकथांब नाही तर पुढे संभाजीनगर साठी चॅनेल नंबर 384 च्या जवळपास दूधना फाटा या ठिकाणी असाच खुशकीचा मार्ग असून त्याने संभाजीनगर गाठल्या जातो किव्हा तेथून उतरल्या जाते अश्यात हा मार्ग अवैध प्रवासी वाहतुकी सोबतच इतर कित्येक कामासाठी वापरला जात आहे हा संशोधणाचा विषय आहे.

एकीकडे निवडणूक दरम्यान अंतर जिल्हा मार्गावर पोलिसांचे चोख बंदोबस्त आहे व प्रत्येक वाहणाची तपासणी होतं आहे सध्या खुशकीच्या मार्गाने काहीही घेऊन हा बेफिकीर कोणतीही व कशाचीही अडवणूक होणार नाही हा विश्वास आहे अवैध वाहतूक करणाऱ्यांना एखाद्या वेळी खुशकीच्या मार्गाने समृद्धी महामार्गावर चढणाऱ्या वाहणाचे अपघात झाल्यास ते वाहन कोठून कधी चढले किव्हा त्याची कोणतीही माहिती समृद्धी प्रशासना जवळ राहणार नाही )

(समृद्धी महामार्गावर अपघात घडू नये म्हणून वाहणांचे फिटनेस इंटरचेंज वरती बघितले जाते त्या नंतरच त्या वाहणाला समृद्धी महामार्गावर प्रवेश दिला जातो मात्र या ठिकाणी तर खुशकीचा मार्ग अवलंबल्या जात असल्याने अपघात झाल्यास जवाबदार कोण ? खुशकीचा मार्ग चोरांना माहित असल्याने चोरटे याच मार्गाचा वापर डिझेल चोरी साठी करत असतील का याचा सुद्धा तपास होणे गरजेचे आहे.

# घनवट, करडक यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करणार : खासदार लोखंडे यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शेतकरी नेते अनिल घनवट व भरत करडक यांनी निवडनुकीच्या पार्श्वभूमीवर केलेले आरोप बिनबुडाचे असुन आठ दिवसात त्यांनी माफ़ी मागावी अन्यथा त्यांच्यावर अब्रूनुकसानीचा दावा ठोकणार असा इशारा खा. सदाशिव लोखंडे यांनी दिला आहे .घनवट यांना शेतकरी क़ायदे करण्यासाठी नेमलेल्या कमिटीत नीट काम करता आले नाही तसेच त्यांचे सहकारी करडक यांना स्वतः चीं कंपनी व्यवस्थित चालवता आली नसल्याचा आरोपही लोखंडे यांनी केला. खेमानंद दुध व शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना २००५ मध्ये कंपनी क़ायदा १९५६ नुसार आपण खासदार होण्यापुर्वी झालेली आहे .या कंपनीच्या माध्यमातून अनेक वर्षे दुग्ध व्यवसाय करण्यात आला .२०१३ साली नवीन कंपनी अँक्ट आल्याने जुना क़ायदा कालबाह्य झाला . नवीन कायद्यानुसार आपला उच्चशिक्षीत मुलगा संतोष लोखंडे यांनी शेतकरी उत्पादक कंपनी सुरू केली .१९ वर्षापासुन कंपनी



व्यवस्थित सुरू आहे .एकाच कुटूंबातील संचालक किंवा ३०० सभासद संख्या याबाबत कंपनी क़ायदा १९५६ मध्ये किंवा सुधारीत क़ायदा २०१३ यात कुठलाही उल्लेख नसताना घनवट व करडक यांचे आरोप निराधार आहेत .सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत आपण हा उद्योग शेतकरी हीतासाठी सुरू केला .ऑपरेशन ग्रीन अंतर्गत क्लस्टरला मंजुरी मिळाली आहे .या योजनेच्या माध्यमातून राज्यात १०० हुन अधिक कंपन्यामार्फत शेतक-यांना फ़ायदा झालेला आहे .आम्ही या प्रकल्पासाठी बँकेकडून वित्तीय साहाय्य घेतलेले आहे .त्यासाठी आमरे राहाते घर,दुकान तारण दिलेले आहे . आजवर राज्यात १००० शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रकल्प उभे राहीलेले आहे . आपला मुलगा प्रशांत लोखंडे हा उच्चशिक्षीत असुन चांगल्या पगाराची नोकरी सोडून शेतक-यांना चांगला भाव मिळावा यासाठी कांद्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्यांने शेतमाल उत्पादक कंपनीची निर्मिती केली .५ हजार मेट्रिक टन क्षमतेचे शितगृह निर्माण करण्यात आले आहे .राज्यात शेतकरी हीत समोर ठेवून चालवल्या गेलेल्या या प्रकल्पाचा शेतक-यांना मोठा फ़ायदा झाला. याचीच पोटदुखी घनवट याना होण्याचे कारण नाही अशी टीका लोखंडे यांनी केली.

# पंधरा दिवसांच्या बंदनंतर आज बाजार समिती सुरु

## सोयाबीन दरात दोनशे रुपये वाढ : प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर प्रथमच साडेचार हजारांचा टप्पा पार

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** मार्च अखेरमुळे भासणाऱ्या नाणे टंचाई अभावी तब्बल पंधरा दिवस बाजार समिती बंद होती. ती आज सोमवार दि.८ रोजी पुर्ववत सुरु झाली असून पहिल्याच दिवशी सोयाबीन दरात दोनशे ते अडीचशे रुपये वाढ झाली असल्याची माहिती हाती आली आहे. मागील दिवसात ४३५० रूपये प्रति क्विंटल पर्यंत भाव होता.तो आज ४६०० रूपये प्रति क्विंटल झाला आहे. परिणामी प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर आज पहिल्यांदाच सोयाबीनने साडेचार हजाराचा टप्पा पार केला असल्याचे बोलले जात आहे. यंदाच्या खरीप हंगामात पेरण्या उशिरा झाल्या त्यातच आगष्ट महिन्यात पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे सोयाबीनचा निम्म्याहून अधिक बहर गळून पडला होता. तर उर्वरीत पिकांवर येलो मोझॅक रोगाने थैमान घातले होते. परिणामी झाडे पिवळे पडून शेंगा भरण्याआधीच करपून गेल्या होत्या. त्याचा थेट परिणाम उत्पन्नावर झाला आणि उत्पादनात कमालीची घट झाली, असे असतांनाही



**सन २०२०-२१ची पुनरावृत्ती व्हावी शेतकऱ्यांची अपेक्षा :** सन २०१२ मध्ये सोयाबीनचे भाव केवळ चार हजार पाचशे रुपये होते. त्यानंतर मात्र सातत्याने सोयाबीनचे भाव वाढतच गेले होते. ६५०० ते ७५०० प्रति क्विंटल भाव सर्रास मिळत होता. एव्हढेच नव्हे; तर सन २०२०-२१ मध्ये दहा हजार रुपयांच्या पुढे टप्पा पार केला होता. मात्र यंदा उत्पादन कमी झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात असतांनाही सोयाबीनचे भाव पाच हजार रुपये प्रति क्विंटलच्या आत आहेत. हे शेतकऱ्यांचे दुर्भग्याच म्हणावे लागेल. त्यामुळे सन २०२०-२१ सालातील भावाची पुन्हा एकदा पुनरावृत्ती व्हावी अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.



कोणत्याही शेतमालाचे उत्पादन कमी हो या जास्त पण आम्हा शेतकऱ्यांचं अर्थकारण हे बाजारपेठेवरच अवलंबून आहे. यावर्षी तर उत्पादन खर्च वसूल होण्याईतपत ही उत्पन्न झाले नाही. त्यामुळे सोयाबीनला किमान आठ ते दहा हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा अशी अपेक्षा आहे.
**नारायण बाजड, ( शेतकरी, नेतन्सा, ता.रिसोड )**

सोयाबीनला भाव कमी मिळत आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. मात्र आज सोमवारी पूर्वीच्या ४३५० प्रति क्विंटल वरून ४६०० प्रति क्विंटल पर्यंत सोयाबीन दराने मजल मारली आहे.२०० ते २५० प्रति क्विंटल झालेल्या भाव वाढीमुळे मात्र थोड्याफार प्रमाणात का होईना, पण शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. शेतकऱ्यांचं अर्थकारण हे सोयाबीन पिकावरच अवलंबून आहे. त्यातच उत्पादन कमी झाल्यामुळे संपुर्ण बजेटच विस्कळीत झाले आहे.त्यामुळे जेमतेम हातात आलेल्या मालाला किमान योग्य भाव मिळावा अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. परंतू मध्यंतरी जवळपास पंधरा दिवस बाजार समिती बंद असल्यामूळे सोयाबीनच्या भावात तेजी येणार की आहेत त्यापेक्षा कमी होणार याची चिंता शेतकऱ्यांना सतावत होती. मात्र आज पूर्ववत बाजार समिती सुरु झाली असून पहिल्याच दिवशी सोयाबीन दरात दोनशे ते तीनशे रुपये वाढ झाली असल्याने शेतकऱ्यांना थोडफार दिलासा मिळाला आहे.

# मुस्लिम सेवेकऱ्यांनी गुरुमाऊलींना दिली श्रीरामाची मूर्ती भेट

## सर्वधर्म समभावाचा उत्तम आदर्श

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे यांचा वाढदिवस साध्या पद्धतीने छोटेखानी सोहळ्यात त्र्यंबकेश्वर समर्थ गुरुपीठात संपन्न झाला. यावेळी मुस्लिम बांधवांनी मोठया संख्येने उपस्थिती नोंदवली आणि सर्वांच्या वतीने अलीम शेख यांनी गुरुमाऊलींना श्रीराम मूर्ती आणि अयोध्येतील राममंदीर प्रतिकृती भेट दिली. उपस्थित हजारो सेवेकरी या सर्वधर्म समभावाच्या प्रसंगाने भारावून गेले.

अखिल भारतीय समर्थ सेवामार्ग व समर्थ गुरुपीठ त्रंबकेश्वरचे प्रमुख गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांचा वाढदिवस दरवर्षी कुठलाही गाजावाजा न करता साधेपणाने व विविध अध्यात्मिक सेवा रुजू करून साजरा केला जातो त्याप्रमाणे तो यावर्षीही साजरा होत असताना त्र्यंबकेश्वर गुरुपीठात 2700 महिला, पुरुष सेवेकऱ्यांनी यानिमित्त एकदिवसीय श्रीगुरुचरित्र पारायण केलं. सकाळी सात वाजता सुरु झालेले एकदिवसीय पारायण दुपारी दीड वाजता पूर्ण झाल्यानंतर सर्वांना महाप्रसाद वाटप करण्यात



आले. दुपारी गुरुमाऊली अभिष्टचिंतन सोहळ्यात ग्रंथतुला करून या ग्रंथाचे मोफत वाटप करण्यात आले.राज्यभरातून प्रतिनिधिक स्वरूपात आलेल्या सेवेकऱ्यांनी आपल्या शब्दसूमनातून शुभेच्छा दिल्या.

सुमारे सात हजार केंद्राच्या माध्यमातून जगभर सक्रिय असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवामार्गातून धर्म,जात, पात , स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत असा कुठलाही भेद न ठेवता सर्वसमावेशक कार्य जोमाने केलं जात आहे. सर्वधर्मीयांचा ओढा सेवामार्गकडे दिसून येतो आहे. विशेषतः मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात सेवेत सहभागी आहेत. आजच्या सोहळ्यात सुद्धा मुस्लिम बांधवांनी मनःपूर्वक सहभागी होऊन गुरुमाऊलींना शुभेच्छा दिल्यानं सर्वच भारावून गेले.

# महेश्वर यात्रेनिमित्त कोळपेवाडीनगरी भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**कोळपेवाडी :** चैत्र पाडव्या च्या शुभ मुहूर्तावर महेश्वराच्या यात्रे निमित्त कोळपेवाडी पंचक्रोशी भाविकाच्या स्वागतासाठी सज्ज झाली असुन विद्युत रोषणाई भाविकांचे लक्ष वेधुन घेत आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागातील सर्वात मोठ्या व पंचक्रोशीचे आराध्यदैवत महेश्वर महाराज यात्रे निमित्त कोळपेवाडी नगरी भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली असुन मंदिरावर करण्यात आलेली विद्युत रोषनाई भाविकाचे लक्ष वेधुन घेत आहे. मंदिराचा नुकताच तिर्थक्षेत्र विकास आराखड्यात समावेश झाल्याने ग्रामस्थांचा उत्साह द्विगुणित होवून यात्रा कमेटिने केलेले सुयोग्य नियोजन भाविकांना सुखद अनुभुती देणार आहे. सकाळी गंगा गोदावरी च्या पाण्याने वाजत गाजत महेश्वरास स्नान घालून यात्रेची सुरुवात होवुन सांयकाळी देवाचे भगत म्हताबाबा कोळपे हे भाविकांनी भरलेल्या बारा गाड्या ओढतात तेव्हा दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. तकतरावाचा प्रथम मान पूर्वापार पासून शहाजापुर गावास आहे कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना सिजन चालू असल्याने भाविकांच्या गर्दी मध्ये वाढ होणार आहे खाऊगल्ली खेळणी रहाट पाळणे प्रसादाचे साहित्य मनोरंजनासाठी आर्केस्टा तमाशा पाडवा पहाट भक्ती गिते बैलगाडा शर्यत नामवंत मल्लाच्या कुस्ती स्पर्धा अशा कार्यक्रमाची रैलचेल असणार आहे यात्रा काळात कोपरगाव ग्रामीण पोलीस स्टेशन चे निरीक्षक संदिप कोळी यांच्या देखरेखी खाली ग्रामीण पोलीस चोख बंदोबस्त बजावनार असुन कुठलाही गैर प्रकार खपवुन घेतला जानार नसल्याची तंबी हौशा नवशा गवशाना देत मागिल यात्रेत कुरापती काढणार्या वर विशेष लक्ष देत अवैध धंदे बंद राहण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन यात्रा नियोजन बैठकीत कोळी यांनी केले .

महेश्वरा बद्दल अख्यायिका सांगितली जाते की बारामती तालुक्यातील सालपे या गावातून मेंढपाळ भटकंती करत कोळगावथडी गोदावरीच्या तीरावर वसले मेंढराना या ठिकाणी मुबलक चारा पाणी मिळू लागला मात्र हा भाग दलदलीचा असल्याने त्यांनी आपला मुक्काम जवळच असलेल्या खडकाळ माळरानावर हलवला. अज्ञात रोगाने मेंढ्या मृत्यूमुखी पडू लागल्याने मेंढपाळानी एकत्र येत गुढी पाडव्या च्या दिवशी दगड गोट्यास शेंदूर लावून मनोभावे पूजा करत वाडयावर आलेले संकट निवारण करण्याची प्रार्थना केली. देवाने भाविक मेंढपाळास स्वप्नात दृष्ठातं देत तळ्या जवळील शेवडिचे पाणी मेंढरास पाजवयास सांगितले या पाण्याने जनावरा बरोबर मानसाचे हि असाध्य रोग बरे होऊ लागल्याने देवाची महती सर्वदुर पोहचुन नवसाला पावनारा महेश्वर पंचक्रोशीचे आराध्य दैवत बनले.

# यवतमाळात शिवसेना विरूद्ध शिवसेनाच लढत!

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात आज नामांकन अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी तीन अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे आता रिंगणात १७ उमेदवार कायम असून, येथे शिवसेना विरूद्ध शिवसेना अशीच थेट निवडणूक होईल, हे स्पष्ट झाले. निवडणुकीत महायुतीकडून रिंगणात असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या राजश्री हेमंत पाटील महल्ले या बाजी मारतात की, महाविकास आघाडीकडून शिवसेना उबाठाचे उमेदवार असलेले संजय देशमुख हे बाजीगर ठरतात, हे ४ जूनलाच स्पष्ट होणार आहे. जिल्ह्यात दुसऱ्या टप्पारतत २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी ३८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीत १८ अर्ज बाद झाल्याने २० उमेदवार रिंगणात होते. यापैकी अपक्ष उमेदवार वैशाली संजय देशमुख, कुणाल जानकर आणि सवाई पवार यांनी आज नामांकन परत घेण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज मागे घेतले. महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांच्या पत्नी वैशाली देशमुख यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने त्या चर्चेत आल्या होत्या. मात्र त्यांनी आज माघार घेतल्याने संजय देशमुख यांनीच खबरदारी म्हणून त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे सांगण्यात येते. मतदारसंघात आता १७ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अभिजित राठोड यांचा अर्ज तांत्रिक त्रुटीमुळे छाननीत रद्द करण्यात आला होता. या निर्णयाविरोधात वंचितचे अभिजित राठोड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज सोमवारी सुनावणी होणार होती. हा निकाल वृत्त लिहिपर्यंत लागायचा आहे. या निकालाकडे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वंचित रिंगणाबाहेर आहे. निकालानंतर चित्र अधिक स्पष्ट होईल.



# एक मत आपले भविष्य घडवू शकते : प्राचार्य लहाने

आधुनिक केसरी न्यूज

**निधोना :** प्रभात कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय निधोना येथे मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी मार्गदर्शन करतांना, लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी ,योग्य व पसंतीचा लोक प्रतिनिधी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपल्याला ग्राम पंचायत ते लोकसभा ह्या लोकप्रतिनिधी गृहात आपले प्रतिनिधी पाठवणे आवश्यक आहे, व त्यासाठी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे एक मत तुमचे व तुमच्या परिसरा चे भविष्य बदलू शकते, विद्यार्थ्यांनी आपले शेजारी, नातेवाईक, मित्र यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगावे.

या कार्यक्रमात उपस्थितांनी व विद्यार्थ्यांनी लोकशाहीत बळकट करण्यासाठी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक शरद सोनवणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ. शफीक पठाण यांनी केले या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. बी.पी. लहाने हे होते तर प्रमुख उपस्थितात डॉ. शिवाजी वाणी, डॉ.संजय पाथ्रीकर , डॉ. शिवाजी दापके, उमेश जाधव , प्रविण काटकर, पप्पू काटकर व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जिल्ह्यात होणार 4 लक्ष 39 हजार 'मतदार माहिती चिठ्ठी'चे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा ज्वर चांगलाच चढला आहे. 13 - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी होणार असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे ध्येय जिल्हा प्रशासनाने ठेवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून 'मतदार माहिती चिठ्ठी' चे वाटप प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी 4 लक्ष 39 हजार 'मतदार माहिती चिठ्ठी' उपलब्ध झाल्या असून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सदर चिठ्ठी पोहचविण्यात आली आहे. याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी नुकताच आढावा घेऊन सुचना दिल्या. श्री. गौडा म्हणाले, बी. एल. ओ. मार्फत 'मतदार माहिती चिठ्ठी' लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजे. ज्या क्षेत्रात मतदार माहिती चिठ्ठ्यांचे वाटप होते, त्या क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढण्याची शक्यता असते. कारण आपले नाव मतदार यादीत आहे, याबाबत नागरिकांना खात्री होते. त्यामुळे 'मतदार माहिती चिठ्ठी'चे नियमित वाटप करा. अधिका-यांनीसुध्दा क्रॉस चेकिंग करून मतदारांपर्यंत माहिती चिठ्ठी पोहोचले की नाही, याची पडताळणी करावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. विधानसभा मतदारसंघनिहाय 'मतदार माहिती चिठ्ठी' चे वाटप : चंद्रपूर जिल्ह्यासाठी एकूण 4 लक्ष 39 हजार 'मतदार माहिती चिठ्ठी' उपलब्ध झाल्या असून यापैकी 4 लक्ष 35 हजार चिठ्ठ्या विधानसभा मतदारसंघात पोहचविण्यात आल्या आहेत. यात राजुरा विधानसभा मतदारसंघात 73 हजार, चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात 86 हजार, बल्लारपूर मतदारसंघात 76 हजार, ब्रम्हपूरी 65 हजार, चिमूर 65 हजार आणि वरोरा विधानसभा मतदारसंघात 70 हजार चिठ्ठ्या देण्यात आल्या आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून आता बी.एल.ओ. मार्फत घरोघरी 'मतदार माहिती चिठ्ठ्यांचे' वाटप करण्यात येत आहे. उर्वरीत चार हजार मतदार माहिती चिठ्ठी चंद्रपूर मुख्यालयात राखीव ठेवण्यात आल्याचे प्रशासनाने कळविले आहे.





# किसनगिरीजी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथील समर्थ सदगुरू किसनगिरीजी बाबांच्या सुरू असलेल्या पंचदिनात्मक पुण्यतिथी सोहळयाची देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने व गुरुदेव दत्तपीठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.दत्तावतारी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा अवतार हा भक्तांच्या उद्धारासाठी व त्यांचे कष्ट दुःख दूर करण्यासाठी झाला असल्याचे स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलताना केले. यावेळी बोलताना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की सदगुरू किसनगिरीजी बाबा हे सामान्य विभूती नव्हे तर ते अवतारी संत होते.

वणवण फिरले कणकण झिजले म्हणून भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी गुरुदेव दत्त पिठाची निर्मिती केली. भक्तांसाठी त्यांनी मंदिराच्या रूपाने मोठा प्रसाद परिसराला दिला,पशू पक्षी प्राणिमात्रांवर देखील त्यांनी प्रेम केले असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. श्री समर्थ सदगुरू बाबांनी दिलेल्या शिकवणीनुसारच आज शांतीब्रम्ह असलेले देवगडचे सदगुरू बाबांनी देखील नियम म्हणजेच जीवन करून घेतले. सात्विक असणं हेच गुरुवर्य भास्करगिरीजी बाबांचे स्वरूप असून त्याग, समर्पण,तपश्चर्या भक्ती,गुरूंबद्दल असलेली निष्ठा त्यांनी अंगिकारली म्हणून भू लोकीवर स्वर्गाच्या रूपाने देवगड क्षेत्राची निर्मिती झाली असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी भगवंताच्या बाल लीलांचे वर्णन त्यांनी केले. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचे संपूर्ण चरित्र हे अगाध व मधुर अनुपम अलौकिक असे असून समुद्राची शाही आणि आकाशाचा कागद जरी केला तरी त्याचे वर्णन हे शब्दांनी करता येणार नाही,वैकुंठामध्ये ही दुर्लभ आलेला व देव आणि भक्तांचे ऐक्य असलेला काला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा यांच्या समवेत मधुकर महाराज पेसोडे, बालब्रम्हचारी विश्वनाथगिरीजी महाराज, नारायण महाराज ससे,गणपत महाराज आहेर, रामनाथ महाराज पवार,लक्ष्मण महाराज नांगरे, पंढरीनाथ महाराज मिस्तरी, बाबासाहेब महाराज सातपूते, विजय महाराज पवार, संजय महाराज निथळे, मृदुंगाचार्य गिरीजीनाथ महाराज जाधव, अमोल महाराज बोडखे, कैलास महाराज पवार,श्रीहरी महाराज वाकचौरे, गणेश महाराज दरंदले, सेवेकरी लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील,बाळकृष्ण महाराज कानडे, तात्या महाराज शिंदे, शुभम महाराज बनकर,अतुल महाराज आदमने, चंद्रकांत महाराज पटारे, सुदर्शन महाराज,नामदेव महाराज कंधारकर, केशव महाराज, मनोहर बाबा,अशोक महाराज गिरी,रोहित महाराज पटारे यांच्यासह नगर भक्त मंडळ,मराठवाडा भक्त मंडळाचे सेवेकरी, वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# पोलिसांनी अनुभवला डिझेल चोरीचा थरार

## पोलिसांच्या वाहनावर डिझेल फुकून पोलिसांना पिटाळले

आधुनिक केसरी न्यूज

**जैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** समृद्धी महामार्ग हा सुसाट झाला पण या मार्गावर कोण सुरक्षित आहे हा प्रश्नच आहे डिझेल चोरी, अपघात, चोरांचा जिवंत होरपाळून मृत्यू,प्रवासी वाहन पलटी होऊन त्यात होरपाळून मृत्यू अश्या कित्येक घटना घडत आहेत तर समृद्धी महामार्गवरील खुश्किचे मार्ग सध्या चर्चेत आहेत 5 एप्रिलच्या रात्री 60 किमीचा पाठलाग करून पोलीस चोरा परियंत पोचले मात्र चोरटे खुशकीच्या मार्गाने पळून गेले चोरांचा पाठलाग करणाऱ्या पोलिसांना चोरट्यानी दक्षिणात्य चित्रपटाची आठवण करून दिली.

समृद्धी महामार्गावर 5 एप्रिलच्या रात्री 1:30 वाजता दरम्यान समृद्धी दुसरबीड येथील टोल नाक्यावर उभ्या असलेल्या ट्रक मधून चोरटे डिझेल चोरत असल्याचा संशय महामार्ग पोलिसांना आल्याने त्यांनी अंधारात उभे असलेल्या ट्रक जवळ जावून पाहणी केली तेव्हा त्यांना दोन ते तीन संशयित इसम दिसून आले पोलीस त्यांच्या परियंत पोचे परियंत त्यांनी त्यांच्या जवळील डिझेल भरलेल्या कॅन तेथेच सोडून वाहन सुरु करून नागपूरकडे भरधावं वेगाने निघाले असता त्यांच्या मागावर महामार्ग पोलीस निघाले 60 किमीचा पिच्छा केला तेव्हा डोणगावच्या जवळपास चोरट्यानी आपल्या जीप मधून मोठ्या डब्याने डिझेल पोलिसांच्या स्कर्पिओ गाडीवर फेकले व आपले वाहन इतर वाहणाच्या मागे पुढे टाकत असल्याने अपघात होण्याची शक्यता पाहता महामार्ग डोणगाव जवळ चोरट्याच्या वाहणाचा पिच्छा सोडला समोरील महामार्ग पोलिसांना डिझेल चोरांची माहिती दिल्या गेली मात्र डिझेल चोर त्यांना कोठेही मिळाले नाही महामार्ग पोलिसांनी अनुभवला डिझेल चोरट्याचा थरार. दुसरबीड ते डोणगाव परियंत चोरट्याचा पिच्छा केला. चोरट्यानी चालू वाहनातून पोलिसांच्या वाहणावर डिझेल फुकून पोलिसाना पिटाळून लावले. समृद्धी महामार्ग हा सुसाट झाला पण या मार्गावर कोण सुरक्षित आहे हा प्रश्नच आहे डिझेल चोरी, अपघात, चोरांचा जिवंत होरपाळून मृत्यू,प्रवासी वाहन पलटी होऊन त्यात होरपाळून मृत्यू अश्या कित्येक घटना घडत आहेत तर समृद्धी महामार्गवरील खुश्किचे मार्ग सध्या चर्चेत आहेत 5 एप्रिलच्या रात्री 60 किमीचा पाठलाग करून पोलीस चोरा परियंत पोचले मात्र चोरटे खुशकीच्या मार्गाने पळून गेले चोरांचा पाठलाग करणाऱ्या पोलिसांना चोरट्यानी दक्षिणात्य चित्रपटाची आठवण करून दिली. समृद्धी महामार्गावर 5 एप्रिलच्या रात्री 1:30 वाजता दरम्यान समृद्धी दुसरबीड येथील टोल नाक्यावर उभ्या असलेल्या ट्रक मधून चोरटे डिझेल चोरत असल्याचा संशय महामार्ग पोलिसांना आल्याने त्यांनी अंधारात उभे असलेल्या ट्रक जवळ जावून पाहणी केली तेव्हा त्यांना दोन ते तीन संशयित इसम दिसून आले पोलीस त्यांच्या परियंत पोचे परियंत त्यांनी त्यांच्या जवळील डिझेल भरलेल्या कॅन तेथेच सोडून वाहन सुरु करून नागपूरकडे भरधावं वेगाने निघाले असता त्यांच्या मागावर महामार्ग पोलीस निघाले 60 किमीचा पिच्छा केला तेव्हा डोणगावच्या जवळपास चोरट्यानी आपल्या



जीप मधून मोठ्या डब्याने डिझेल पोलिसांच्या स्कर्पिओ गाडीवर फेकले व आपले वाहन इतर वाहणाच्या मागे पुढे टाकत असल्याने अपघात होण्याची शक्यता पाहता महामार्ग डोणगाव जवळ चोरट्याच्या वाहणाचा पिच्छा सोडला समोरील महामार्ग पोलिसांना डिझेल चोरांची माहिती दिल्या गेली मात्र डिझेल चोर त्यांना कोठेही मिळाले नाही. सुमारे दोन तासाचा थरार आटोपल्या नंतर पोलीस दुसरबीड टोल नाक्यावर पोचले असता तेथे ज्या ज्या वाहणाचा डिझेल चोरीला गेलें त्या वाहनाना दोन कॅन मधील डिझेल दिले तेव्हा पोलिसांनी उभ्या वाहणाची माहिती घेतली असता त्या ठिकाणी 500 लिटर पेक्षा जास्त डिझेल चोरीला गेल्याची माहिती मिळाली. (चोरट्यांना समृद्धी वरील सर्वच खुश्किचे मार्ग माहित असल्याने डिझेल चोरून चोरटे काहीच किमीमध्ये पसार होऊन जातात ज्याने त्यांचा थांग पत्ता लागत नाही.)

( डोणगाव पासून जवळच समृद्धीच्या पेट्रोल पंपा लगत व बेलगाव जवळ समृद्धीवरती चढण्या उतरण्या साठी खुशकीचे मार्ग असून यातून चोरटेसह अवैध वाहन जा ये करत आहेत.) (चोरट्यानी पोलिसांच्या गाडीवर डिझेल फेकून त्यांचा पोलिसांनच्या गाडीला आग लावण्याचा तर प्रकार नव्हता ना अशी सुद्धा शक्यता नाकारता येत नाही) महामार्ग पोलीस मलकापूर पोलीस उप निरीक्षक गजानन उज्जेणकर, दीपक पिठकर नापोका, योगेश शेळके चालक यांनी पाठलाग केला होता तसेच या प्रकरणाची माहिती किनगाव राजा पोलीस स्टेशनला देण्यात आलेली असल्याची माहिती महामार्ग पोलिसांकडून मिळाली.

# शनिभक्तांना थेट भुयारी दर्शन महाद्वारात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**विजय खंडागळे**

**सोनई :** शनिशिंगणापूरला भुयारी दर्शन महाद्वाराकडे जाण्यासाठी जाण्यासाठी आता देवस्थान वाहनतळालाच मंदिराच्या पश्चिम दिशेला नवे प्रवेशद्वाराचे बांधकाम सुरू आहे. यामुळे शनिभक्तांचा थेट भुयारी दर्शन महाद्वारात प्रवेश होऊ शकणार आहे. शिंगणापूर येथे नवीन भुयारी दर्शन महाद्वार भक्तांच्या सोयीसाठी झाले त्यापूर्वी शनिमंदिराजवळ राहुरी मार्गावर पूर्वेला प्रवेशद्वार होते. भुयारी दर्शन मार्गमुळे शनिभक्तांना आता ऊन, पाऊस यापासून संरक्षण मिळाले. भक्त थेट शनिचौथऱ्याजवळ या मार्गमुळे विना अडचण जाऊ लागले. भुयारी दर्शन मार्ग मंदिराच्या पश्चिमेला असून या मार्गांवरून भक्तांना पानसतीर्थ प्रकल्प बघता येतो. कारण या दर्शन मार्गाची रचना भाविक भक्तांसाठी तशी करण्यात आली. मात्र, दर्शन महाद्वाराकडे



जाण्यासाठी देवस्थान मालकीच्या वाहन तलावरच जावे लागते. भक्तांना प्रथम त्यांची वाहने थेट देवस्थान पार्किंगमध्ये न्यावी लागतील. वाहन तळावर वाहन पार्किंग होताच भक्त लगतच्या भुयारी दर्शन महाप्रवेशद्वारात जात आहेत. मात्र देवस्थान पार्किंग नेमकी कुठे आहे, याकडे शनिभक्तांचे लक्ष वेधण्यासाठी व शनिभक्तांचे वाहन विनासायास भुयारी दर्शन रांगेकडे जाण्यासाठी वाहन तळालाच आता नवे प्रवेशद्वार होत आहे. त्यामुळे भक्तांना ते आणखी सोयीचे ठरणार आहे. देवस्थानची पार्किंग नेमकी कुठे आहे, हे भक्तांना लवकर लक्षात येत नाही. देवस्थान पार्किंग जवळ भक्तांची वाहने येण्यापूर्वीच ती खासगी पार्किंगवाले मध्येच अडवून डाव साधत असतात. अशावेळी भक्तांची फसवणूक होत असते. खासगी पार्किंगवाले भक्तांना फ्री पार्किंगच्या नावाखाली नंतर पूजेचे साहित्य खरेदीत गंडा घालत असतात. त्यामुळे देवस्थानचे पार्किंग आता भव्य प्रवेशद्वारातून शनिभक्तच्या नजरेस पडणार आहे. देवस्थानकडून शनिशिंगणापूर येथे राहुरी, सोनई मार्गावर पश्चिम बाजूस देवस्थान पार्किंगला आता नवे प्रवेशद्वार बांधकाम सुरू आहे. त्यामुळे दर्शन मार्गात आणखी सुधारणा होणार आहे. यामुळे वाहने थेट आता देवस्थान वाहन तळावर पार्किंग होणार असून वैभवात भर घालून भाविकांना एक प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे.

# आज गुढीपाडवा मोठ्या आनंदात साजरा करा; जि.प. सदस्य गोपीचंद जाधव यांचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील समस्त



नागरिकांना जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांच्याकडून शुभेच्छा गुढीपाडवा हा सण हिंदू नववर्षाची सुरुवात म्हणून साजरा केला जातो. देशात विशेषतः महाराष्ट्रात हा सण साजरा होतो. गुढीपाडवा सामान्यतः मार्च किंवा एप्रिल महिन्यात येतो. चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी हा सण साजरा होतो. चैत्र हा हिंदू पंचांगातला पहिला महिना आहे. यंदा गुढीपाडवा 9 एप्रिल मग़ळवार रोजी साजरा होत आहे. या दिवसापासून मराठी नवीन वर्षाची सुरुवात होते महाराष्ट्रीयन लोक त्यांच्या नातेवाईकांना, नवे वर्ष, नवी सुरुवात... नव्या यशाची, नवी रूजवात गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा! नव वर्षाची सुरूवात होवो न्यारी... सुख-समृद्धीने सजो आपली गुढी... हीच शुभेच्छा माझ्याकडून आहे आज नवीन वर्षाचा दिवस "वास्तुपूजा" आणि नवीन व्यावसायिक प्रतिष्ठान उघडण्यासाठी देखील शुभ मानला जातो. राज्यभरात अनेक सामुदायिक मिरवणुका काढण्यात आल्या. या उत्सवाशी अनेक कथा निगडित आहेत, त्यापैकी प्रमुख म्हणजे 'सृष्टीचा सिद्धांत आणि लंकेतील राजा रावणाचा पराभव करून प्रभू राम अयोध्येला परतले तो दिवस. शालिवाहन नावाच्या हिंदू कॅलेंडरच्या चैत्राच्या पहिल्या दिवशी वर्ष सुरू होते. महाराष्ट्रातील पैठण येथील राजा शालिवाहन यांच्या नावावरून हे नाव पडले आहे. सर्व मित्रांना जि. प. सदस्य गोपीचंद जाधव यांच्याकडून शुभेच्छा आणि गुढीपाडवा मोठ्या आनंदात साजरा करा गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा.

# पळसवाडी येथे १०८ कुंडीय शतचंडी, पर्जन्ययागाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी गावात आज रोजी भूमि शुद्धि, कन्यापूजन, गोपुजन, अशा विविध पुजनांनी श्री श्री १००८ स्वामी गोविंद चैतन्य महाराज श्रद्धा आश्रम टुणकी यांच्या मार्गदर्शनाखाली आखतवाडा पळसवाडी परिसरात १०८ कुंडीय शतचंडी व पर्जन्ययागाचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहेत.दिनांक १८/०४/२०२४ रोजी यज्ञाला प्रारंभ होणार आहेत. विविध 16 राज्यातून संत महात्मा या यज्ञामध्ये संमलित होऊन प्रवचनातुन लाखो लोकांना मंत्रमुग्ध करणार आहे. सकाळी ७वाजेपासून ते ११ वाजेपर्यंत ८०० यजमान यज्ञ पूजेसाठी सहभाग घेऊन या महायज्ञामध्ये होमवनाचा लाभ घेणार आहेत. अशाच प्रकारे दुपारी १ ते ४ वाजेदरम्यान ८०० यजमान या होमहवनाचा लाभ घेणार आहेत. याच पद्धतीने दुसऱ्या दिवशीही असाच विधी चालणार आहे. साधारण या महायज्ञासाठी तीन हजार ते साडेतीन हजार यजमान महापूजेचा लाभ घेणार आहेत. अन्नदान हे तीन दिवस रोज सकाळी ११ वाजेपासून ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत महाप्रसाद चालू असणार आहे.

या कार्यक्रमाच्या यज्ञासाठी दिले जाणारे दान व गोपूजन, गो ग्रास, ब्राह्मणासाठी सुवर्णदान, भूमीदान, गोदान, गोरगरिबांसाठी वस्त्रदान व तिन्ही दिवस अन्नदान चालणार आहे. असे आवर्जून श्री श्री १००८ गोविंद चैतन्य महाराज यांनी सांगितले आहे.





# श्री रामराज्य वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## विविध गीते, नृत्य देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे मुख्य बाजार पेठ रेणुका माता मंदिर परिसर मैदानावर रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे श्री रामराज्य वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.याप्रसंगी शाळेतील मुलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन विविध प्रकारचे नृत्य सादर केले.

यामध्ये प्रथम श्री गणेशाला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. देशभक्तीपर गीत, कोळीगीत, शेतकरी आत्महत्या नाटिका, अशा विविध प्रकारे गीते सादरीकरण करून पालकांचे व उपस्थित प्रेक्षकांचे मने चिमुकल्यांनी जिंकली, तसेच रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये नेहमीच शैक्षणिक ज्ञानाबरोबरच विविध कलागुणांना वाव देण्यात येतो, स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक पोलीस उपनिरीक्षक खुलताबाद श्री भालेराव साहेब, यांची उपस्थिती होती, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अप्पाराव नलावडे सरपंच बाजार सावंगी हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.आदिनाथ वाकळे, प्रा. सोनावणे सर, नवनाथ कोल्हे, जमादार बाजार सावंगी, विनोद बिघोद जमादार, ज्ञानेश्वर नलावडे, पंडित खंडागळे, सोमनाथ साळुंखे, गणेश अधाने, प्रभाकर शिंदे, पंजाजी अण्णा, दिनेश अंभोरे, दिपक शेट काळे, किशोर नलावडे, करण चंदवाडे, अविराज निकम, भानदास नलावडे, जानकीराम नलावडे ,नामदेव नलावडे आदी उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येमध्ये पालक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष विश्वंभर नलावडे, सूत्रसंचालन इंगळे सर यांनी केले, भोपळे सर वेताळ सर, श्रीमती पूजा नलावडे, सीमा शेळके, मनीषा गायकवाड, निकिता खुटे, रुपाली गायकवाड, अत्तार मॅडम, या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तुरकणे कुटुंबाकडून छत्रपती विद्यालयाच्या वर्गखोल्यांसाठी एक लाखाची देणगी दान

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शिर्डी लगत असलेल्या पिंपळवाडी येथील छत्रपती शंभूराजे माध्यमिक विद्यालयात ज्या शाळेत आपले बंधू माजी सरपंच कै रामनाथ नानासाहेब तुरकणे व गणेश कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन कै उमाकांत. नानासाहेब तुरकणे या दोघांनी. शिक्षण घेतले त्या शाळेतील मुलांच्या शिक्षणासाठी शालेय वर्गाच्या बांधकामासाठी बंधुच्या स्मृती निमित्ताने एक लाखाची देणगी पोटी धनादेश नुकताच शाळेचे मुख्याध्यापक दिनकर पोटे युवा नेते विवेक कोल्हे गणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे उध्दव महाराज मंडलिक सुनील कोळपकर यांच्याकडे भारत तुरकणे यांनी एका कार्यक्रमात सुपुर्द केली यावेळी बोलताना मुख्याध्यापक दिनकर पोटे म्हणाले की दोन बंधुच्या स्मृती निमित्ताने त्यांचे बंधू भारत तुरकणे यांनी एक लाखाची देणगी देऊन गोरं गरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वर्ग खोल्या बांधण्यासाठी केलेली मदत व राबवलेला उपक्रम कौतुकास्पद असुन बंधुप्रेम कसे असते हेच दाखवून दिले असून त्यामुळे शिक्षण घेत असलेल्या मुलांची शालेय खोल्यांची अडचण दूर होणार असून तुरकणे परिवाराचे दातृत्व समाजातील लोकांना प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापक दिनकर पोटे म्हणाले बंधु प्रेम कसे असावे यांचे उदाहरण रामायणात दिसून येते हे जरी खरे असले तरी हजारो वर्षांनतर देखील पिंपळवाडी. येतील भारत तुरकणे यांनी बंधु प्रेम कसे असावे व कुणाल तुरकणे यांनी वडीला प्रती श्रद्धा कशी असावी. हेच त्यानी समाजाला आपल्या कामातून दाखवून दिले असून त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणात कोठेही मागे राहु नये तो शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने त्याने यश मिळवले पाहिजे यासाठी तुरकणे कुटुंबाचे दातृत्व महाभारतातील कर्णाच्या बरोबरीत कोठे तसुभरही कमी नाही, असे गौरवोद्‌गार काढले. यावेळी विविध मान्यवरांनी आपल्या भाषणात तुरकणे परिवाराच्या विविध सामाजिक धार्मिक सांस्कृतिक कार्याच्या योगदानाबद्दल आपले मत व्यक्त केले. यावेळी माजी उपसभापती दिपक तुरकणे परिवहन अधिकारी सुरेश तुरकणे अभिजित तुरकणे लक्ष्मण तुरकणे शाळेतील शिक्षक शिक्षिका विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी आभार संजय तुरकणे यांनी मानले.




# तरुणींना हटकणे युवकांच्या जीवावर बेतले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** 'मुली असून तुम्ही चौकात सार्वजनिकरित्या सिगारेट ओढता, तुम्हाला लाज वाटायला हवी,' असा सल्ला युवकाने दोन तरुणींना दिला. त्या तरुणींनी आपल्या मित्राला बोलावून त्या युवकाचा खून केला. ही घटना रविवारी पहाटेच्या सुमारास हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. रंजीत बाबुलाल राठोड (२६, ज्ञानेश्वरनगर) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. या हत्याकांडात दोन तरुणींसह तिघांना अटक करण्यात आली. रंजीत राठोड हा गल्लोगल्ली जाऊन साडी विक्रीचा व्यवसाय करतो. तो पत्नी व तीन मुलांसह ज्ञानेश्वरनगरात राहतो. तो शनिवारी रात्री अकरा वाजता जेवन करून फिरायला बाहेर पडला होता. त्यावेळी जयश्री पानझाडे (२४, वाडी) आणि सविता सायरे (२३) या दोन तरुणी महालक्ष्मी नंबर एक, बाकडे सभागृहाजवळ सिगारेटचे झुरके घेत उभ्या होत्या. तेथून रंजीत जात असताना त्याला दोन्ही तरुणी दिसल्या. त्याने दोन्ही तरुणींना सिगारेट न पिण्याचा सल्ला दिला. त्यामुळे दोन्ही तरुणींना त्याचा राग आला.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# ओमप्रकाश राठोड यांना पीएच्.डी. प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**मंठा :** येथील स्वामी विवेकानंद विद्यालयतील मराठी विषयाचे माध्यमिक शिक्षक ओमप्रकाश राठोड यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच्.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी परतूर येथील लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक असलेले प्रा. डॉ.अशोक पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली " मराठी शाहिरी वाङ्‌ममयातील लावणी व पोवड्यातून व्यक्त झालेले पुरुष चित्रण : एक अभ्यास "या विषयावर संशोधन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला शोधप्रबंध सादर केला होता. या विषयावर त्यांची गेल्या फेब्रुवारी महिन्यात विद्यापीठाच्या मराठी विभागांतर्गत भ्रमणध्वनीसंचाच्या आभासी वाहिनीद्वारे मौखिक परीक्षा घेण्यात आली होती. या मौखिक परीक्षेसाठी अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.दासू वैद्य उपस्थित होते, तर बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ.मार्तंड कुलकर्णी यांची उपस्थिती होती. ओमप्रकाश राठोड यांनी पीएच्.डी पदवी प्राप्त केल्याबद्दल मराठी विभाग प्रमुख डॉ.दासू वैद्य , समीक्षक डॉ. कैलास अंभुरे ,डॉ. मधुकर क्षीरसागर, डॉ.बाळासाहेब गायकवाड, संस्थेच्या अध्यक्षा आशाताई आकात, उपाध्यक्ष डॉ.कुणाल आकात, सचिव कपिल आकात, तसेच आमदार राजेश राठोड, प्राचार्य भारत खंदारे, भगवान राठोड, डॉ. सुधाकर जाधव, प्राचार्य लव बिरादार, मुख्याध्यापक बाबासाहेब ताठे, उपमुख्याध्यापक राजकुमार ठोकरे, पर्यवेक्षक डॉ.संतोष मोरे, रमेश ढवळे ,माजी प्राचार्य अंकुश मोरे, डॉ.धोंडोपंत मानवतकर, प्रा.के.एम. कांबळे, प्रा. डॉ.सदाशिव कमळकर,प्राचार्य के. पी. इंगळे, प्रा.सौ.शोभा डहाळे, संस्थाध्यक्ष पंडित प्रधान प्रा.प्रदीप देशमुख, शिवाजी जाधव, बाबुजी तिवारी, प्रा. छबुराव भांडवलकर ,प्राचार्य डॉ.अशोक मुसळे ,प्राचार्य जनार्दन थोरात,यांच्यासह आविष्कार साहित्य मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांनी व स्वामी विवेकानंद विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर मित्रांनी अभिनंदन केले आहे.

# प्रा. डॉ. सतीश मस्के यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य लेखन पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** येथील कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. सतीश मस्के यांना यावर्षीचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य लेखन पुरस्कार' छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पदवी व पदव्युत्तर संशोधक विद्यार्थी समितीद्वारे विद्यापीठाच्या मुख्य नाट्यगृहात समतेचे युवा पर्व भीमोत्सव २०२४ निमित्ताने पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. विजय फुलारी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्याचबरोबर प्रमुख पाहुणे प्र. कुलगुरु प्रोफेसर डॉ. वाल्मीक सरवदे, उद्घाटक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. दिलीप चव्हाण यांच्या हस्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतील विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे, आधिसभा सदस्य डॉ. हरिदास सोमवंशी, डॉ.प्रकाश इंगळे व मंगेश गवई आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ.सतीश मस्के यांना या अगोदर शैक्षणिक, सामाजिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विविध राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे सहा ग्रंथ ही प्रकाशित झालेले आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर. एन. शिंदे, उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, कॉलेज कमिटी चेअरमन धनराज जैन, संचालक मंडळ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. के.डी.कदम, प्रा. डॉ. धम्मपाल घुंबरे , प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व मित्रमंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.





# नांदेड जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हाअध्यक्ष (शहर)पदी शंकर बाजीराव शिंदे

## अजहरुद्दीन शेख यांच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** नुकत्याच झालेल्या नांदेड जिल्हा युवक काँग्रेसच्या निवडीमध्ये नांदेड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री स्वर्गीय बाजीराव पाटील शिंदे यांचे चिरंजीव शंकर बाजीराव शिंदे यांची जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष(शहर)पदी निवड करण्यात आली.त्यांची ही निवड त्यांचा केलेला कामाचा अनुभव व नुकत्याच सुरुवात झालेल्या न्याय विश्वास या कार्यक्रमांमध्ये त्यांनी जिल्ह्यात नव्हे तर राज्यात अग्रगण्य क्रमांक मिळून या पदाला उचित ठरले आहे, असे महाराष्ट्र युवक काँग्रेस प्रभारी रोहित कुमार यांनी सांगितले आहे.या निवडी बद्दल राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मल्लकार्जुन खर्गे, श्रीमती सोनियाजी गांधी, श्री, राहुल गांधी, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी कृष्णा अलावरू, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. व्हीं. श्रीनिवास, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जी, महाराष्ट्राचे गटनेते मा. बाळासाहेब थोरात साहेब, मा.अमित देशमुख, मा.विश्वजीत कदम, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष मा. कुणाल दादा राऊत, महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी उदय भानु सह प्रभारी मा.कुमार रोहीत जी,मा.आ.वसंतराव चव्हाण साहेब, बी.वी.श्रीनिवास काका, हनमंतराव पाटील बेटमोगरेकर साहेब,बी.आर.काका,आ. मोहनराव हंबर्डे, मा.आ.महाधवराव पाटील जवळगावकर, बंडू पाटील चव्हाण, आणि सर्व सहकारी यांनी त्यांच्या वरती विश्वास ठेवून ही जबाबदारी दिल्या बद्दल त्यानी मनःपूर्वक आभार मांडलं पक्षाने त्यांच्यावर टाकलेला विश्वास ते सार्थ ठरवत या पदाला न्याय देत पक्ष संघटना मजबूत करत येणाऱ्या काळामध्ये पक्षासाठी मोलाचं योगदान देतील असं ते प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं.

# लाखांचे बक्षीस जाहीर असलेल्या दोन नक्षल महिलांसह एका समर्थकास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रकांत पतरंगे**

**गडचिरोली :** विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या दोन नक्षल महिलांसह एका नक्षल समर्थकास पोलिसांनी अटक केली आहे. या तिघांवर महाराष्ट्र शासनाने साडेपाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. काजल उर्फ सिंधू गावडे (वय २८ रा. कचलेर, ता. एटापल्ली), गीता उर्फ सुकली कोरचा (वय ३१, रा रामनटोला, ता. एटापल्ली) अशी अटकेतील नक्षलींची, तर पिसा पांडू नरोटे (रा. झारेवाडा, ता. एटापल्ली) असे नक्षल समर्थकाचे नाव आहे. लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु असताना हिंसक कारवाया करण्याची योजना नक्षलवादी आखत आहेत. त्यामुळे पोलिस ठिकठिकाणी नक्षलविरोधी अभियान राबवीत आहेत. असेच अभियान राबवीत असताना सी-६० पथक, पिपली बुर्गी येथील पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांनी काजल आणि गीता यांना जवेली येथील जंगलातून अटक केली. पिसा नरोटे या नक्षल समर्थकास गिलनगुडा जंगलातून अटक करण्यात आली आहे. काजल आणि गीता यांच्यावर प्रत्येकी २ लाख, तर पिसा नरोटेवर दीड लाख रुपयांचे बक्षीस महाराष्ट्र शासनाने जाहीर केले होते, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

काजल गावडे ही २०१२ मध्ये नक्षल्यांच्या प्लाटून क्रमांक ५५ ची सदस्य झाली. २०१९ पर्यंत ती तेथे कार्यरत होती. पुढे २०२० पर्यंत ती कंपनी क्रमांक ४ मध्ये सक्रीय होती. त्यानंतर ती स्टॉफ टीम व प्रेस टीमची विभागीय सदस्य म्हणून कार्यरत होती. २०१९ मध्ये नरकसा, दराची व बोधीनटोला येथील चकमकी, २०२० मधील किसनेली, २०२१ मध् फुलकोडो, खोब्रामेंढा आणि मोरचूल येथील चकमकीत तिचा सहभाग होता. शिवाय २०१९ मध्ये कनेली आणि पुसेर जंगलात स्फोटके दडवून ठेवण्यातही ती प्रत्यक्ष सहभागी होती. सप्टेंबर २०२० मध्ये अबुझमाड एरियात तिची बदली करण्यात आली. २०१९ मध्ये मोरोमेट्टा-नेलगुंडा, २०२० मध्ये कोपर्शी-पोयारकोठी आणि २०२१ मध्ये कोपर्शी जंगलात झालेल्या चकमकीत ती सहभागी होती. २०२० मध्ये कोठी येथे पोलिस जवान आणि २०२१ मध्ये कोठी- भामरागड मार्गावर एका नागरिकाच्या हत्येत तिचा सहभाग होता. अटकेतील तिसरा नक्षल समर्थक पिसा नरोटे हा २०१८ पासून नक्षल्यांना वेगवेगळ्या कामात सहकार्य करायचा. २०२१ मध्ये तो जनमिलिशिया कमांडर झाला. २०२२ मध्ये झारेवाडा आणि गोरगुट्टा येथील इसमांच्या हत्येत त्याचा प्रत्यक्ष सहभाग होता. तसेच २०२३ मध्ये टिटोडा येथील पोलिस पाटलाचा खून करण्यातही तो सहभागी होता. शिवाय २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान टिटोडा येथे स्फोटके पुरवून ठेवण्यात त्याचा सहभाग होता, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. गडचिरोली पोलिसांनी जानेवारी २०२२ पासून आतापर्यंत ७७ नक्षल्यांना अटक केली आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पालिस अधीक्षक यतीश देशमुख, कुमार चिंता, एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय राखीव दलाचे सहायक कमांडंट मोहितकुमार, दीपक दास, पिपली बुर्गी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी वैभव रुपवते, गट्टा जांभिया पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी चेतन परदेशी आदींनी ही कारवाई केली.





# विद्यार्थ्यांनी केला आवडत्या शिक्षकाचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील जायकवाडी (उत्तर) येथील शाहू विद्यालयातील विद्यार्थी प्रिय शिक्षक तथा साहित्यिक म्हणून सर्व परिचीत असलेले श्री. अय्युब पठाण लोहगांवकर यांचा वाढदिवस १ एप्रील रोजी होता. यासाठी याच शाळेतील वर्ग आठवी ( ब ) चे सेमीतील सर्व विद्यार्थी यांनी आपल्या आवडते वर्गशिक्षक अय्युब पठाणसरांचा दोन केक कापून व शाल श्रीफळ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करून पठाणसरांना त्यांच्या पुढील चांगल्या जीवनासाठी सर्व मुलांनी प्रार्थना केली. यावेळी चिमुकल्या मुलांनी शिक्षक अय्युब पठाण यांचा वाढदिवस साजरा करून भव्य सत्कार केल्याबद्दल पठाणसरांच्या डोळ्यातून आनंदअश्रु वाहत होते. शिक्षक अय्युब पठाण हे शाहू विद्यालयात मागील २५ वर्षापासून प्रभावी अध्यापनाचे कार्य करणारे शिक्षक आहे. ते लोकप्रिय व विद्यार्थी प्रिय शिक्षक अशी त्यांची ख्याती आहे. असे हे हरहुन्नरी शिक्षक अय्युब पठाणसर हे ३१ मार्च २०२५ला आपल्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होणार आहे.

# केजरीवाल यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आपतर्फे सामूहिक उपवास व भजन

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा तसेच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या तानाशाही पध्दतीने अटक करण्यात आली. अटकेत असतांना त्यांचे आरोग्य ढासळत असल्याची बातमी मिळाल्याने त्यांना उत्तम आरोग्य लाभावे व त्यांची लवकर सुटका व्हावी तसेच देशातील तानाशाही व्यवस्थेला सुबुद्धी लाभावी याकरिता शहरातील आम आदमी पक्षाच्या कार्यकारणीने बस स्थानकासमोरिल इंडिया आघाडीच्या पेंडालमध्ये सामुहिक उपवास आयोजित केले. या कार्यक्रमात पवित्र रमजान महिन्याच्या अनुषंगाने शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार यांनी रोजा ठेवला, तसेच इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी सामूहिक उपवास ठेऊन केजरीवाल यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. यासह याठिकाणी भजन गाऊन प्रार्थना करण्यात आली. यावेळेस जिल्हा उपाध्यक्ष नागेश्वर गंडलेवार, शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार, शहर संघठन मंत्री रोहित जंगमवार, प्रवक्ता आसिफ हुसेन शेख, महिला अध्यक्ष किरण खन्ना, उपाध्यक्ष सलमा सिद्दीकी, युवा अध्यक्ष सागर कांबळे, गणेश अकोले, पप्पू श्रीवास्तव, बेबीताई बुरडकर, रेखा भोगे, मीनाक्षी अकोले व इत्यादी पदाधिकारी तसेच आप व इंडिया आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




# रेल्वेस्थानक परिसरात चोरट्यांचा गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** पाठलाग करून पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागरिकांना थोपविण्यासाठी चोरट्यांनी हवेत गोळीबार केल्याची घटना आज संध्याकाळी मलकापूर रेल्वे स्थानक परिसरात घडली. यानंतर तिघे चोरटे फरार होण्यात यशस्वी ठरले. यामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण होते. उलट सुलट चर्चांनाही उधाण आले. मलकापूर येथील रेल्वे स्थानकातून चोरट्यांनी पळ काढत जवळच असलेल्या रामवाडीत हवेत गोळीबार केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी पोलीस दाखल झाल्यावर नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला. वृत्त लिहिपर्यंत गुन्हा दाखल झाला नसून मलकापूर पोलीस फरार चोरट्यांचा युद्धपातळीवर शोध घेत आहे. पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज संध्याकाळी फ्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गंगासागर एक्सप्रेस आली होती. त्यातील प्रवाशाच्या मोबाईल चोरीच्या प्रयत्नात हे तिघेजण होते. तीन चोरट्यांचा प्रयत्न फसल्यानंतर नागरिकांकडून त्यांना पकडण्याचा प्रयत्न झाला. त्या चोरट्यांनी पळ काढला. यावेळी नागरिक मागे येत असल्याचे पाहून तिघांपैकी एका चोरट्याने आपल्या जवळील पिस्तुलातून हवेत गोळीबार केला. फलाटावर आधीपासूनच बसून असलेल्या 'त्या' तिघांनी एका प्रवाशाचा मोबाईल हिसकण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार तेथे असलेल्या प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरड करीत त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला.